



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






❋ वर्ष ६५ वे ❋ अंक ६४ ❋ नांदेड ❋ सोमवार, दि. ९ मार्च २०२६ ❋ पृष्ठे ६ ❋ किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


### न्यूझीलंडचा ९६ धावांनी धुव्वा उडवत सलग दुसऱ्यांदा टी २० क्रिकेट ‘चॅम्पियन’

# भारत विश्वविजेता! कोट्यवधी भारतीयांचे स्वप्न साकार

**अहमदाबाद (वृत्तसंस्था)** – अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रविवारी भारतीय क्रिकेटने नवा इतिहास रचला. टी-२० वर्ल्ड कप २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करत विश्वचषकावर आपले नाव कोरले. विशेष म्हणजे, टीम इंडियाने सलग दोन टी-२० वर्ल्ड कप जिंकणारा पहिला संघ बनण्याचा मान मिळवला आहे. न्यूझीलंडसमोर २५६ धावांचा डोंगर उभा केल्यानंतर भारतीय गोलंदाजांनीही कमाल दाखवत किवी संघाचा पराभव केला.

जसप्रीत बुमराह आणि अक्षर पटेल यांच्या घातक माऱ्यासमोर न्यूझीलंडचा डाव १५९ धावांवरच आटोपला आणि भारताने ९६ धावांनी दणदणीत विजय मिळवत तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक पटकावले. हा केवळ विजय नव्हता, तर भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा अभिमानाचा क्षण होता.

**सॅमसन-अभिषेक-ईशानचं वादळ**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवरच्या या सामन्यात टीम इंडियाने २० षटकांत पाच बाद २५५ धावांची मजल मारली. सलामीच्या संजू सॅमसननं सलग तिसऱ्या सामन्यात झळकावलेलं वेगवान अर्धशतक भारताच्या या डावाचं प्रमुख वैशिष्ट्य ठरलं. त्याने ४६ चेंडूंत पाच चौकार आणि आठ षटकारांसह ८९ धावांची खेळी उभारली. संजू सॅमसननं अभिषेक शर्माच्या साथीनं पहिल्या विकेटसाठी ९८ धावांची आणि ईशान किशनच्या साथीनं दुसऱ्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी रचली.

भारताच्या पहिल्या तिन्ही फलंदाजांनी स्फोटक फलंदाजी करून न्यूझीलंडच्या



आक्रमणाच्या चिंधड्या उडवल्या. त्यामुळंच भारतीय डावाच्या आठव्या षटकात शतक आणि १५ व्या षटकात द्विशतक धावफलकावर लागलं. पण जेम्स नीशामनं १६ व्या षटकांत तीन फलंदाजांना माघारी धाडून भारताच्या डावाला ब्रेक लावला.

त्याआधी, अभिषेक शर्मानं २१ चेंडूंत सहा चौकार आणि तीन षटकारांसह ५२ धावांची, तर ईशान किशननं २५ चेंडूंत चार चौकार आणि चार षटकारांसह ५४ धावांची खेळी केली. त्यानंतर हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे यांनी मोठे फटके खेळून भारताला पाच बाद २५५ धावांचा पल्ला गाठून दिला.



**जसप्रीत बुमराह अन् अक्षर पटेलने न्यूझीलंडला गुंडाळलं**

मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या न्यूझीलंडची सुरुवात मात्र अत्यंत खराब झाली. भारताचे वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि फिरकीपटू अक्षर पटेल यांनी अचूक आणि घातक गोलंदाजी करत किवी फलंदाजांना बांधून ठेवले. नियमित अंतराने विकेट्स घेत भारताने सामन्यावर पकड मजबूत केली. दबावाखाली खेळणाऱ्या न्यूझीलंडच्या फलंदाजांना मोठी भागीदारी करता आली नाही. परिणामी संपूर्ण संघ १५९ धावांवर मर्यादित राहिला आणि भारताने हा सामना ९६ धावांनी जिंकला.

## कमवा आणि शिका योजनेतून मुलींना मिळणार २००० रुपये - चंद्रकांत पाटलांची घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)** –महिला सबलीकरणासाठी केवळ महिलांनीच नव्हे तर सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजे. सांगली जिल्ह्यामध्ये महिला सबलीकरणासाठी आम्ही नवीन प्रयोग केला. यातून ५० शाळांमधील ३६ हजार मुलींना दर आठवडा एक तास शनिवारी कराटे आणि ज्युडो प्रशिक्षण आम्ही दिले. त्यातील पहिला येलो बेल्ट १५ हजार ४०० मुलींना आम्ही आज दिला आहे. त्याच्या पुढचे बेल्ट मिळवण्यासाठी जे जे शुल्क द्यावे लागते ते प्रशासन देणार आहे. त्याचबरोबर जून महिन्यापासून प्रत्येक शाळेत स्वसंरक्षणासाठी लाठीकाठीचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची घोषणा चंद्रकांत पाटील यांनी केली. ते रविवारी सांगलीत आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.



राज्यातील महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या ५ लाख मुलींना कॉलेज फी नाही, होस्टेल फी नाही. या व्यतिरिक्त दर महिना दोन हजार रुपये कमवा आणि शिका योजनेतून देणार असल्याची घोषणा उच्चतंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. सांगलीतील मुली व महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत कराटे प्रशिक्षण झालेल्या मुलींना येलो बेल्ट आणि प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खा. विशाल पाटील, आ. इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांच्यासह अधिकारी, कराटे प्रशिक्षण घेतलेल्या मुली मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

महिला दिनानिमित्तच्या कार्यक्रमात कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत मुलीचे मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण पाहून मला माझ्या मुलींची आठवण झाली. मला ही दोन मुली आहेत. हे मुलींचे कराटे प्रशिक्षण पाहून माझे म्हातारपण सुखरूप जाईल, असे खासदार विशाल पाटील यांनी वक्तव्य करताच कार्यक्रमात हशा पिकला. सांगलीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. यावेळी कराटे प्रशिक्षण घेतलेल्या जवळपास १ हजार मुलींना यलो बेल्ट ग्रेड प्रमाणपत्रचे वितरण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पार पडले.

## इंधनाची कुठलीही कमतरता नाही - मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती



**मुंबई (प्रतिनिधी)** –राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युद्धजन्य परिस्थितीमुळे देशात, राज्यात गॅस आणि इंधनाचा तुटवडा होत असल्यासंदर्भात भूमिका मांडली. यावेळी घरगुती गॅस सिलेंडरच्या ६० रुपयांच्या दरवाढीसंदर्भातील प्रश्नावरही त्यांनी उत्तर दिले. घरगुती गॅसचे दर ६० रुपयांनी वाढले आहेत. यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, लोकांमध्ये चुकीची माहिती देऊन पॅनिक तयार करू नका, भारत सरकारने अतिशय स्पष्टपणे या संदर्भातली भूमिका मांडली आहे. भारताच्या एनर्जी सिक्युरिटीच्या संदर्भात कशाप्रकारे मोदीजींनी पाऊल उचलली आहेत हे आपल्यासमोर आलेलं आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

सध्या देशात एलपीजी गॅसची तुटवड्याची परिस्थिती जाणवत आहे, आणि याचा सर्वात मोठा परिणाम हॉटेल उद्योगावर झाला आहे. कमर्शियल एलपीजी गॅसचे दर अचानक १५० ते २०० रुपयांनी वाढले आहेत. त्यामुळे हॉटेल व्यवसाय पुढे कसा चालवायचा, हा प्रश्न व्यवसायिकांसमोर उभा राहिला आहे. दुसरीकडे घरगुती गॅसच्या दरातही ६० रुपयांची वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या घराचे गणित बिघडले आहे. त्यातच, गॅस सप्लायही काही शहरांत बंद पडल्याचे पाहायला मिळते. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारणा केली असता, असा कुठलाही प्रकार नाही, माध्यमांनी लोकांना पॅनिक करू नये, भारत सरकारने याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे, असे सांगितले.

**परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज**

दोन-तीन दिवस झाले, काही माध्यमांनी चालवून दिलं की, पेट्रोल-डिझेलचा तुटवडा होणार, या वृत्ताने विनाकारण पेट्रोल पंपावर रांगा आपल्याला पाहायला मिळाल्या. भारत सरकारने सांगितलं की, अशी कुठलीही कमतरता होणार नाही. त्यामुळे भविष्यात जी परिस्थिती उद्भवेल याचा सामना करण्याकरता भारत सरकार मोदीजींच्या नेतृत्वात सक्षमपणे भक्कम परिस्थितीत आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत बोलताना सांगितले.

**गॅस दरवाढीमुळे महिलांच्या तक्रारी**

पुण्यात घरगुती गॅस सिलेंडरच्या वाढलेल्या दरांमुळे महिलांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सिलेंडरचे दर सातत्याने वाढत असल्याने त्याचा थेट परिणाम त्यांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. महिलांचे म्हणणे आहे की, गॅसचे दर वाढत आहेत, तेलाचे दर वाढत आहेत, किराणा आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे दरही वाढले आहेत. मात्र आमचे पगार काही वाढत नाहीत. गॅस एजन्सीकडे गेल्यानंतर अनेक वेळा वेळेवर गॅस मिळत नाही, अशी तक्रारही महिलांनी केली आहे.

### प्रफुल्ल पटेल यांना रोहित पवार यांचं ‘चॅलेंज’

## व्हीएसआर कंपनी मालकाच्या मुलाच्या लग्नाबद्दल सांगा

**बारामती (प्रतिनिधी)** – राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारीला बारामती येथे झालेल्या विमान अपघातामध्ये मृत्यू झाला होता. यानंतर अजित पवार प्रवास करत असलेल्या व्हीएसआर कंपनीची विमाने सदोष असल्याचा आरोप करत आमदार रोहित पवार यांनी या कंपनीविरोधात रान उठवले होते. या पार्श्वभूमीवर गुरुवारी व्हीएसआर कंपनीचे मालक आर. के. सिंला सीआयडीने चौकशीसाठी बोलावले होते. तसेच जय पवार यांनी आर. के. सिंगचा एक व्हीडीओ देखील शेअर केला होता. अशातच आता



आमदार रोहित पवार यांनी राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी सवाल केले आहेत. व्हीएसआर कंपनी मालकाच्या मुलाच्या लग्नाला आपण गेला होतात का? असा सवाल रोहित पवारांनी प्रफुल्ल पटेलांना केला.

प्रफुल पटेल आपणास विनंती आहे की, अजितदादांच्या अपघाताला /घातपातला कारणीभूत असलेल्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाचा मुलगा रोहित सिंग याच्या राजस्थानमध्ये पार पडलेल्या लग्नात आपण गेला होतात का? गेला असालच तर त्या लग्नात इतर कोण नेते होते आणि कुठल्या पक्षाचे होते हे तुम्हाला माहीतच असेल ते आपण लोकांना सांगावं. तुम्ही स्वार्थी आहात की अजितदादाप्रेमी आहात, हे महाराष्ट्राला दाखवून द्या. उद्या पत्रकार परिषद घेऊन याबाबत स्पष्टीकरण द्याल, ही अपेक्षा..! असे ट्वीट करत रोहित पवार यांनी सवाल उपस्थित केले.

## मजुराचा मुलगा बनला ‘आयपीएस’



**जालना (प्रतिनिधी)** –यूपीएससी परीक्षेचा निकाल दोन दिवसांपूर्वी जाहीर झाला. जालना येथील एका सालगड्याच्या मुलाने यश संपादन करत आपल्या आई, वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे.


जालना जिल्ह्यातल्या भोकरदन तालुक्यातील जळगाव सपकाळ येथे राहणाऱ्या एका मजुराच्या मुलाने यूपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होत आयपीएस पदाला गवसणी घातली आहे. २६ वर्षाचा भिकन रोजेकर हा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये ८१२ क्रमांकावर उत्तीर्ण झाला आहे. अतिशय कष्टातून शिकवणाऱ्या आई-वडिलांचे स्वप्न त्याने पूर्ण केले. भिकनच्या या यशामुळे तो राहत असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये मोठा आनंद उत्सव पाहायला मिळतोय.

## शंकरनगर परिसरातील चार गावे चार दिवसांपासून अंधारात

### चिटमोगरा येथील अंत्यविधीची पूजा केली बिसलरी बाटलीच्या पाण्याने

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – बिलोली तालुक्यातील शंकरनगर परिसरातील चिटमोगरा, कामरसपल्ली, बिजूर, केरुर आदी गावातील विद्युत पुरवठा चार दिवसांपासून खंडित करण्यात आला आहे. थकबाकी भरा अन्यथा विद्युत पुरवठा बंद करण्यात येईल, अशी माहिती गावातील प्रत्येक ग्रामपंचायतीला महावितरणाच्या विभागाने प्रत्यक्ष दर्शनीय भागात नोटीस लावण्यात आली होती. परंतु काही वीज ग्राहकांमध्ये अव्वाच्या सव्वा विद्युत बिले आल्याने महावितरणच्या अधिकाऱ्यांना विचारणा करत असताना त्यांनी मला काही कारण सांगू नका, थकबाकी भरा अन्यथा गावचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात येईल अशी वारंवार ताकीद देत होते. परंतु वीज वितरण कंपनीने शंकरनगर परिसरातील काही गावांची थकबाकी जास्त असल्यामुळे गेल्या चार दिवसापासून विद्युत पुरवठा बंद केला आहे. ज्यामुळे नागरिकांना चार दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचा व सध्या पवित्र रमजान महिना चालू असताना उन्हाळ्यात उष्णतेचा त्रास सहन करावा लागत आहे.

चिटमोगरा येथील सतिश नारायण चापोले यांचे निधन झाले असताना त्यांचा अंत्यविधी पूजा बिसलरी बाटलीतील पाणी वापरून करावा लागला. चिटमोगरा येथील सतिष नारायण चापोले यांचे ७ मार्च रोजी दुपारी दोनच्या सुमारास निधन झाले असता त्यांचा दुसऱ्या दिवशी करावा लागणारा अंत्यविधी सायंकाळी दिवाबतीची सोय नसल्याने त्याच दिवशी अवघ्या काही तासातच अंत्यविधि करावा लागला असून, गावात निर्माण झालेल्या पाणीटंचाईमुळे मयताच्या स्नानासाठी बाहेर गावाहून बिस्र्लरी बाटलीच्या पाण्याने मयतास स्नान घालावे लागले.



## इस्त्रायलनं पहिल्यांदा गाझापट्टीत शाळा, दवाखाने, बाजारपेठ, नागरी वस्त्या संपवल्या

### आता इराणमध्ये तेलसाठे नष्ट करण्यास सुरुवात, ३० इंधन टँक, तेल डेपो टार्गेट

**इस्त्रायल (वृत्तसंस्था)** –अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्ध नवव्या दिवशी प्रवेश करत आहे. इस्त्रायलने इराणमधील तेल साठवण सुविधांवर हल्ले सुरू केले आहेत. इस्त्रायलकडून ३० इराणी इंधन टाक्या आणि अनेक तेल डेपो टार्गेट करण्यात आले आहेत. दरम्यान, ट्रम्प यांनी शनिवारी सांगितले की, अमेरिकेला इराणने पूर्ण पराभव स्वीकारावा अशी इच्छा आहे. ट्रम्प यांनी सांगितले की याचा अर्थ असा की इराण लढाई सुरू ठेवू शकणार नाही आणि शेवटी शरणागती पत्करू शकणार नाही. त्यांनी म्हटले की इराणने एकतर शरणागती पत्करावी किंवा त्यांची लष्करी ताकद इतकी कमकुवत करावी की ते लढण्यास असमर्थ ठरेल. दुसरीकडे, इराणी सैन्याने शनिवारी अमेरिकेला पर्शियन आखातात प्रवेश केल्यास त्यांची जहाजे बुडवण्याची धमकी दिली.

इराणचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी अलीकडेच



म्हटले आहे की, अमेरिकन नौदल लवकरच होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेल टँकरचे संरक्षण करण्यासाठी पर्शियन आखातात जहाजे पाठवू शकते.

इराणमध्ये आतापर्यंत ६६६८ नागरी क्षेत्रांना टार्गेट करण्यात आले आहे. या हल्लयांमुळे ५५३५ घरे आणि १०४१ दुकानांचे नुकसान झाले आहे. १४ वैद्यकीय केंद्रे आणि ६५ शाळांवरही हल्ला करण्यात आला. अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धात आतापर्यंत १४८३ जणांचा मृत्यू झाला आहे.१३ रेड क्रेसेंट केंद्रांवरही हल्ला झाला. युद्धात आतापर्यंत १७६५ इस्त्रायली जखमी झाले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी सांगितले की इराणने आपल्या शेजाऱ्यांसमोर शरणागती पत्करली आहे. त्यांनी हे त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, ट्रुथ सोशलवर पोस्ट केले. ट्रम्प यांनी दावा केला की इराणने शेजारी देशांची माफी मागितली आहे आणि त्यांच्यावर पुन्हा हल्ला न करण्याचे आश्वासन दिले आहे. अमेरिका आणि इस्त्रायलच्या सततच्या हल्लयांमुळे हे घडले आहे. ट्रम्प यांनी म्हटले की इराण आता मध्य पूर्वेतील प्रमुख शक्ती राहिलेली नाही, तर पराजित आहे. इराण शरणागती पत्करत नाही किंवा पूर्णपणे कमकुवत होईपर्यंत ही परिस्थिती कायम राहू शकते. खरं तर, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी अलीकडेच शेजारच्या देशांवरील हल्लयांसाठी माफी मागितली. त्यांनी म्हटले की इराणवर त्यांच्या भूमीतून हल्ला केला जात नाही तोपर्यंत शेजारी देशांवर हल्ला केला जाणार नाही.

## आखाती देशांची माफी मागून इराणी राष्ट्रपती एकटे पडले, देशात विद्रोह

**तेहरान (वृत्तसंस्था)** – मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षात इराणी राष्ट्रपतींनी माफी मागितल्याने इराणमध्ये अंतर्गत वाद उफाळून आला आहे. राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्या माफीने सत्ताधाऱ्यांमध्ये फूट पडली आहे. आखाती देशांवर केलेल्या हल्ल्याबद्दल राष्ट्रपती यांनी माफी मागितली होती. त्यासोबत यापुढे हल्ला करणार नाही, असा शब्दही त्यांनी दिल्याने इराणमधील कट्टरपंथी नाराज झाले आहेत. त्यामुळेच पेझेक्शियान यांनी विश्वास दिल्यानंतरही आखाती देशांवर सैन्याने हल्ला सुरू ठेवला आहे.



इराणी राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलं होते की, मी वैयक्तिक त्या शेजारील देशांची माफी मागतो जे इराणी हल्लयामुळे प्रभावित झाले आहेत. या देशांनी इस्त्रायल आणि अमेरिका यांनी युद्धात मदत करू नये असं माझे आवाहन आहे असं त्यांनी सांगितले होते. पेड़ोश्कियान यानी ट्रम्प यांचा विना अट आत्मसमर्पण करण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला. इराणच्या अस्थायी नेतृत्व परिषदेने शेजारील राष्ट्रांवरील हल्ले रोखण्यावर सहमती दर्शवली आहे. जोपर्यंत या देशांच्या भूमीवरून इराणवर हल्ले होणार नाहीत तोपर्यंत इराणही हल्ला करणार नाही अस त्यांनी म्हटलं.

पेझश्कियान यांच्या माफीने इराणमध्ये राजकीय खळबळ माजली आहे. ज्यातून त्यांच्या कार्यालयाला हे स्पष्टीकरण द्यावे लागले की, इराणी सैन्य अमेरिकन ठिकाणांवरून होणाऱ्या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देईल. काही तासांनी राष्ट्रपतींनी सोशल मीडियावर त्यांचे विधान पुन्हा पोस्ट केले. परंतु यावेळी त्यांनी माफी हा शब्द हटवला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शिक्षणव्यवस्थेचा कणाच धोक्यात

शिक्षणाच्या खासगीकरणाच्या नावाखाली सुरू असलेल्या जीवघेण्या स्पर्धेत सरकारी मराठी शाळांचे अस्तित्वच संकटात सापडले आहे. ही केवळ शाळांची संख्या घटण्याची बाब नाही, तर समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचवण्याच्या संविधानिक आणि नैतिक जबाबदारीवरच गदा येण्याचा हा गंभीर टप्पा आहे. सरकारी शाळा अर्थात जिल्हा परिषदेच्या शाळा टिकत नाहीत, की टिकू दिल्या जात नाहीत, हा प्रश्न आता टाळता येण्याजोगा राहिलेला नाही. शिक्षण विभागाची उदासीन मानसिकता, सरकारची ढासळलेली इच्छाशक्ती आणि बाजारू शिक्षणव्यवस्थेचा वाढता दबाव यांचा परिणाम म्हणून सार्वजनिक शिक्षण व्यवस्था हळूहळू कोलमडत चालली आहे. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे राजकीय उदासीनता आणि इंग्रजी शाळांच्या संचालकांची धनशक्ती. यू-डायस या अधिकृत अहवालातून समोर आलेली आकडेवारी धक्कादायक आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील तब्बल ७ हजार ७४२ सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या केवळ एक ते दहा इतकीच आहे. तर ५२ हजारांहून अधिक शाळा ११ ते १०० विद्यार्थ्यांच्या आधारावर कशाबशा टिकून आहेत. पुणे, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि गडचिरोली या जिल्ह्यांतील पटसंख्येतील घट 'गंभीर' श्रेणीत मोडणारी आहे. राज्यात एकूण १ लाख ८ हजार ९० शाळा असून त्यामध्ये सुमारे २ कोटी १५ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र शेकडो शाळा विद्यार्थ्यांशिवाय केवळ कागदोपत्री सुरू आहेत, हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. ही स्थिती वेळीच थांबवली नाही, तर येत्या दोन-तीन वर्षांत साडेसात हजारांहून अधिक सरकारी शाळांना टाळे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे केवळ शैक्षणिक नव्हे, तर सामाजिक आपत्तीचे संकेत आहेत. विरोधाभास असा की, राज्यातील एकूण विद्यार्थ्यांची संख्या मात्र घटलेली नाही; उलट लक्षावधी नवीन विद्यार्थी दाखल झाले आहेत. हे विद्यार्थी सरकारी शाळांऐवजी खासगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वळले आहेत. यामागची कारणे स्पष्ट आहेत की रोजगारासाठी शहरांकडे होणारे स्थलांतर, शिक्षणाचे बाजारूकरण, सरकारी शाळांच्या गुणवत्तेबाबत निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, तसेच इंग्रजी शिक्षणाची वाढती मानसिक गरज. मात्र खासगी शिक्षण महागडे असून ते सर्वसामान्य आणि गरीब कुटुंबांच्या आवाक्याबाहेरचे आहे. गाव, वस्ती, विद्यार्थी, पालक, शाळा आणि शिक्षक यांची परंपरागत साखळी तुटत चालली आहे. गरजेपेक्षा प्रचंड प्रमाणात खासगी शाळांची वाढ झाली असून, पाच-दहा हजार लोकसंख्येच्या एका गावात पाच-सहा शाळा असणे खरोखरच आवश्यक आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. वरकरणी ही शैक्षणिक 'स्पर्धा' सुखावणारी वाटत असली, तरी तिचा थेट बळी सरकारी शाळा ठरत आहेत. खाजगी इंग्रजी शाळांमध्ये गुणवत्ता असती तर आपण समजू शकलो असतो, परंतु भरमसाठ शुल्क आकारून देखील शैक्षणिक गुणवत्ता मात्र अत्यंत बाजारू आणि निकृष्ट दर्जाची आहे. यातून कोणत्या प्रकारचे नागरिक निर्माण होणार आहेत याचे उत्तर कोणताही नेता देऊ शकत नाही. कारण त्यांचेही हात दगडाखाली चेपले गेले आहेत. या स्थितीला प्रशासनाची धोरणेही तितकीच जबाबदार आहेत. जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांवर शिक्षणाव्यतिरिक्त सरकारी कामांचा वाढता बोजा, नियुक्त्या आणि बदल्यांमधील सततचा गोंधळ, रिक्त पदे वेळेवर न भरणे, संचमान्यतेची टांगती तलवार, शाळा विलीनीकरण आणि बंदीची भीती, या सर्व घटकांनी सरकारी शिक्षण व्यवस्था खिळखिळी केली आहे. याचा थेट परिणाम मराठी माध्यमावर होत असून, मराठी शिक्षणाची दुरवस्था ही मराठी भाषेच्या घसरणीचेही एक महत्त्वाचे कारण बनत आहे. जागतिक महासत्तेच्या स्पर्धेत उभ्या असलेल्या देशासाठी शिक्षणातील ही विषमता आणि असंतुलन अत्यंत घातक आहे. प्राथमिक शिक्षण मजबूत असेल, तरच समाज आणि देश मजबूत होतो. मात्र आज सरकारी शाळा नैसर्गिक मृत्यूने मरत नाहीत, तर त्यांना योजनाबद्धपणे मारले जात आहे, हे विदारक वास्तव स्वीकारावेच लागेल. या स्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाही. सार्वजनिक शिक्षण व्यवस्था वाचवणे ही केवळ सरकारची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. अन्यथा शिक्षणाच्या नावाखाली उभे राहिलेले हे विषमतेचे दुभंग भविष्यात अधिक भयावह रूप धारण करेल.

# तणावमुक्तीचा मार्ग आनंद शतगुणीत करणारा



अखिल भारतीय साहित्य परिषदेची शाखा आम्ही मेहकरमध्ये स्थापन केल्यावर भारतीय सौर वर्षानुसार स्वामी विवेकानंदांची जंयती दि.०२/०२/ २४ ला मेहकरच्या मे ए सो महाविद्यालयात साजरी केली.यानिमित्ताने 'आईबाबा स्मृती व्याख्यानमालेचा शुभारंभ झाला.विविध विचारपीठावरुन या व्याख्यान मालेतील व्याख्यानाचेआयोजन व्हावे हाआमचा हेतू आहे.पहिले व्याख्यान ' ताणतणाव मुक्तीसाठी स्वामी विवेकानंदाचा संदेश ' या विषयावर होते.जालना येथील प्रा.बी.वाय.कुलकर्णी सरांनी तणावमुक्त कसे जगावे?हे सौदाहरणअत्यंत सुरेख,विनोदी शैलीने, हास्यरसपरिपूर्ण वातावरणात आणि आनंदसागरात विहार करण्याचीअनुभूतीच युवामनाला प्रदान केली. विनोदामधून एका आनंदपर्वणीचे ते प्रात्यक्षिकच होते.

प्रत्येक गोष्ट आपल्याला तर्कानी सिद्ध करणे शक्य नसते.बेरजेपेक्षा गुणाकार नेहमीच जास्त येतो. हा तर्क जर खरा आहे तर १+१=०२आणि ११=१ असे का होते ? आपण पुढचा विचार करतो आणि सुरुवात विसरतो.स्थूलाचा विचार करतांना आपण सूक्ष्म विसरुन जातो.काही वेळेस आपण अकारण मनस्ताप वाढवून घेतो.आणि तणावग्रस्त होतो.एक माणूस न्हाव्याच्या दुकानात दाढी करण्यास गेला. न्हावी त्याची दाढी करू लागला.याने प्रश्न विचारला, तुम्ही कधी गाढवाची दाढी केली आहे का?न्हावी म्हणतो,नाही,आज आणि आत्ता तो योग आला आहे.तेंव्हा या व्यक्तीला खजिल तर व्हावे लागलेच, पण काही कालावधीपर्यंत अकारण मनस्तापही त्याला सहन करावा लागला.आपण आपली जीभ ताब्यात ठेवत नाही त्यामुळे तो प्रसंग आपल्यासाठी मनस्तापाचा आणि इतरांसाठी विनोदाचा होतो.

तसेच चिरंजीव या शब्दाचा अर्थही जो जीव नेहमीसाठी अमर आहै असा होतो. तरी, त्यांचे चिरंजीव आत्ताच वारले.असा शब्दप्रयोग आपणास नेहमीच ऐकायला मिळतो.शब्दाचे अर्थ निट समजून न घेता वापरल्याने आपल्या अगाध भाषा अज्ञानाचे प्रदर्शन तर आपण करतोच आणि विनोदाचा विषय होतो.मग लोक आपल्याला का हसतात?यांना दात काढण्याशिवाय दुसरे काही उद्योग नाहीत.असा शेरा मारुन आपण आपल्यासाठी सुरक्षा कवच निर्माण करतो, पण आपल्यातला कमकुवतपणा मात्र शोधत नाही.तो शोधण्यासाठी आत्मपरिक्षण करावे लागते. स्वार्थी माणसं त्यासाठी कधीच तयार नसतात आणि अतिसामान्य बौद्धीक कुवत असणारी माणसं ते करु शकत नाहीतं. हे मनुष्य वर्तनातील खूप मोठे दुर्दैवच. त्याचा परिणाम समाज व राष्ट्रजीवनावर होतो. हा व्यापक विचार करण्याची दुर्दैवाने कुणालाही गरज वाटत नाही.

या अनुशंगाने बी वाय कुलकर्णी सरांनी आपल्या एका किर्तनकार मित्राचे दिलेले उदा. खूपच अप्रतिम.एकेदिवशी त्या मित्राचा फोन आला.तो म्हणाला,माझ्या किर्तनाला किती लोक येतात,किती हाऊसफुल्ल गर्दी असते,मी बोलतो कसा ? याचा अनुभव घेण्यासाठी एकदा सोलापूरला ये.विशिष्ट तारीख,वार व वेळ त्यांनी सांगीतला.त्याच्या अती आग्रहामुळे मी सुद्धा अती उत्साहाने गेलो. किर्तन संपल्यावर दर्शनसोहळा सुरु झाला.मी सुद्धा रांगेत उभे राहून देवासमान मित्राच्या दर्शनाचाअलभ्य लाभ घेतला.मोठ्या श्रद्धेने व भावभक्तीने त्याच्यासमोरच्या दानपेटीत १००रु टाकलेआणि क्षणभर त्याच्यासमोर थांबलो पण मित्राला माझ्याकडे पहायला वेळ होता कुठे?तो मोठ्या कामात गुंतला होता.मी सरळ पुढे निघून गेलो.त्याच्याजवळ आम्हा दोघांना ओळखत असलेली माणसं होती. त्यांनी त्याला सांगीतले, अहो ते बी वाय कुलकर्णी तुमच्या जवळून गेले. महाराजांचा इगो थोडा जागा झाला,मला न भेटताच कसा काय निघून गेला? मग मला परत बोलवून नेले.परत एकदा या महान विभूतीला मी साष्टांग दंडवत घातला आणि म्हणालो. महाराज मी आपल्याला नमस्कार केला होता.अतिशय कार्यमग्न असलेले महाराज म्हणाले, हो मी जरा कलेक्शन मध्ये होतो. मी आश्चर्याने म्हणालो, म्हणजे ! तो म्हणाला, पैसे मोजत होतो,बरं सांग किर्तन कसं झालं. मी म्हणालो, एकदम बेस्ट ,पण हे तू सांगू नको असं मी म्हणताच तो एकदम दचकला आणि म्हणाला, का?मी म्हणालो,हे मी सर्वासमोर सांगू का तुला एकट्याला सांगू? तो म्हणाला फक्त मलाच सांग. त्याच्याजवळ बसलेल्या सर्वांची तिथून तात्काळ सुटी करण्यात आली.मला जवळ बसवून तो अत्यंत नम्र स्वरात म्हणाला, मला ऐकू येईलं एवढ्याच हळू आवाजात बोलं मी त्याच्या त्या आज्ञेचं पालन करुन अगदी शांततेनं व हळू आवाजात बोलू लागलो, किर्तन अगदी बेस्ट झालं.तुझी भाषा,तुझा आवाज,स्वरातील आरोह, अवरोह,अप्रतिमच.उदा.दाखले देवून ईश्वरभक्ती तू श्रौत्यांच्या अगदी गळी उतरवलीस,त्यामुळे तू धन्य आहैसक्षणभर त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य झळकले व आनंदी छटा पसरल्या.नंतर मी म्हणालो, पण हे तू सांगू नये.

या माझ्या एका वाक्याने त्याचा चेहरा खर्रकन उतरला. तात्काळ त्याच्या चेहऱ्यावर अमवस्याची मध्यरात्र जाणवू लागली.मीही क्षणभर थांबलो.तो म्हणाला,बोलं मी पुढे बोलू लागलो,तू सांगीतलं, शरीरं नश्वर आहे,नाशिवंतआहे,हे सर्व मर्त्य आहे, त्यासाठी देहाचे लाड नको,धनसंचय तर मुळीच नको.तो म्हणाला,हो यातं माझं काय चुकलं ? मी त्याची उक्ती आणि कृतिविषयी बोलू लागलो.मग तुझ्यासाठी आयोजकाकडून केशरदूध,बादामपिस्त्याचा शिरा,सर्व श्रोत्यासाठी काळा चहा, तुझ्यासाठी पुरणपोळी त्यावर गावरान तूपाची धार आणि आमच्यासाठी बटाट्याची भाजी,त्या भाजीला चवं शोधून सापडत नव्हती.तुझ्यासाठी उच्चासन,त्यावर फोमची गादी बाजूला कुलर,सर्व मंडपासाठी फक्त दोन पंखे,बसण्यासाठी सतरंजीअगदी टोकदार खडे टोचत होते रे सर्व भक्तांना.मी सुद्धा तो अनुभव घेतला रे.मग देहाचे लाड कोण करतं होते? या सर्व प्रकारावरुन प्रबोधनाची गरज कोणाला आहे? तो खूपच खजिलं झाला.

पुढे मी म्हणालो,मंदिरं दगडामातीची आहेतं. शरीर हे एकमात्र ईश्वरनिर्मित मंदिर आहे.त्यामुळेच देह देवाचे मंदिर असे म्हणतात.ते स्वच्छ,निर्मळ, सुंदर,छान व पवित्र असले पाहिजे.मंदिर स्वच्छ करुन आल्यावर येतांना जो माणूस व्यसनाधिन व वासनांध होत असेलं,तर त्या मंदिर सफाईला अर्थ काय?हे सर्व ऐकुण तो क्षणभर स्तब्ध झाला.पुढे मी बदललो असे कळवत होता.तो बदलला असेलं यावर विश्वास ठेवण्याशिवाय मी तरी काय करु शकतो?

मित्रहो गणित,आपण बुद्धीने सोडविते. विज्ञान प्रयोगशाळेत सिद्ध करतो.कवितांचे श्रवण भावनांनी करतो आणि भजन,किर्तनात समर्पणाने तल्लिन होतो. नसता कानानी पहाणे व डोळ्यांनी ऐकण्याचा विसंगत प्रयोग होईल आणि त्याचा निष्कर्ष काय निघेलं ? हे सांगण्यासाठी कोणत्याही तत्ववेत्याची आवश्यक्ता नाही.मानवी उत्क्रांतीचा अभ्यास करत असतांना कपडे घालण्यास सुरुवात का झाली?नागडे शरीरं हे वासनांना जन्म देते. त्यासाठीच ते झाकल्या गेले पाहिजे.पुढे शरीराची गरज पूर्ण करण्यासाठी विवाहसंस्थाचा जन्म झाला.विवाह संस्थांना वळण लावण्यासाठी कुटुंबसंस्था निर्माण झाल्या. त्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी कुटुंबप्रमुख महत्वाचा वाटला.यातून निर्माण झालेल्या समाज व्यवस्थेला न्याय देण्यासाठी राजेशाहीआली. त्या मधील बेबंदशाहीला प्रत्युत्तर देण्यास लोकशाहीची निर्मिती झाली.पण मतदार पैसे घेवून मतदान करतात.हे वास्तव समोर आल्यावर उत्क्रांती इथे स्थितिशीलं झाली आहे.तीला गतीशील करण्यासाठी वाटचाल सुरु करण्याची गरज आहे.

आपल्या वर्तनातीलं दोष शोधून आपल्यात सकारात्मक बदल करु शकणारा आत्मपरिक्षण करण्यास सक्षम असतो.माझा शर्ट फाटका आहे किंवा तोंडाला काळे लागले आहे किंवा माझे केस विस्कटलेले आहेत. त्यावेळी आरशासमोर उभे राहिल्यास तो आपले व्यंग,उणिवा,दोष दाखवून देतो.तेंव्हा आरसा फोडायला निघालेली माणसं आपल्या आईवडिलांचे महत्व कसे जानणार?आरसा फोडण्याची प्रवृती कृतघ्न आहे.एवढेच नव्हे तर ती विचित्र व विक्षिप्त प्रवृतीकडे वाटचाल करते.युवा- पिढीला आरसा दाखवण्याचे काम आईबाबा स्मृती व्याख्यानमाला करेलं,आरसा फोडणाऱ्या प्रवृती कदाचित तीला बंद पाडण्याचे काम करतीलं त्या साठी जागरुक राहुन हे काम अविरतपणे सुरु ठेवले पाहिजे.सत्य जाणून उपाययोजना शोधल्या गेल्या पाहिजेत.हे सिद्ध करण्यासाठी एक अत्यंत विनोदी उदा.देऊन सरांनीनी आपल्या व्याख्यानाचा समारोप केला.

एकदा एक माणूस डॉक्टरकडे गेला आणि म्हणाला, माझ्या बायकोला ऐकू येत नाही हो! डॉक्टर म्हणाले,तुम्ही त्यांना घेवून काआला नाही? तो म्हणाला,ती इथे यायला तयार नाही.या वयात मी तिला उचलून आणू शकत नाही,पण तुम्ही औषध द्या,ते तिला कसे द्यायचे ते मी पहातो. डॉक्टर म्हणाले,मी सांगतो त्याप्रमाणे टेस्ट करा.हा घरी गेला.विस मिटरवरुन हाक मारली,त्यानंतर पंधरा मिटरवरुन,नंतर दहा मिटरवरुन व पाच मिटरवरुन याला बायकोची ओ.... ऐकू आली नाही.शेवटी हा जवळ जाऊन जोरात ओरडला. बायको तेवढ्याच जोरात ओरडून म्हणाली,अहो तुमच्या हाकेला ओ देण्याची ही पाचवी वेळ आहे. समस्येचे निराकरण बिनचूक होणे गरजेचे आहे. नसता आग सोमेश्वरी आणि बंब रामेश्वरी होण्याच्या अनेक घटना पहायला ऐकायला व अनुभवायला मिळतात.ते होता कामा नव्हे. हा सुंदर तणावमुक्तीचा अनुभव आमच्या कायम स्मरणात राहीलं.युवापिढीसमोर निवृत झाल्यावर त्यांच्या समस्येचे निराकरण घेवून गेल्याने जेष्ठांचा आनंद शतगुणीत होतो. हा स्वानुभव आमचे मानवी जीवन समृद्ध व संपन्न करणारा होता.तो आम्ही वारंवार घेणार आहोत.

-प्रा. वसंत गिरी
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# गर्भाशय मुखाचा कर्करोग टाळता येणे शक्य



आठ मार्च हा दिवस 'जागतिक महिला' दिवस म्हणून दर वर्षी साजरा करण्यात येतो. 'जागतिक महिला' दिनी स्त्रियांच्या विविध समस्यांवर चर्चा होते. या 'जागतिक महिला' दिनाचे औचित्य साधून, नांदेड शहरातील स्त्रीरोग तज्ञ डॉ. योगिनी श्रीवल्लभ कार्लेकर यांचा, स्त्रियांमधे उद्भवणाऱ्या 'सर्व्हायकल कॅन्सर' (गर्भाशयमुखाचा कर्करोग) या आजरा विषयीची माहिती या लेखात देत आहोत.

'गर्भाशयमुखाचा कॅन्सर' ही भारतासारख्या विकसनशील देशास भेडसावणारी मोठी व प्रमुख आरोग्य समस्या आहे. २०१८ च्या ग्लोबोकॅन रिपोर्ट प्रमाणे, भारताचा सर्व्हायकल कॅन्सर संदर्भात पहिला क्रमांक लागतो. दरवर्षी या कॅन्सरमुळे ७०,००० स्त्रिया मृत्यू मुखी पडतात. म्हणजेच दर सातव्या मिनिटाला एका स्त्रीचा मृत्यू 'गर्भाशयमुखाच्या' कॅन्सरमुळे होतो.

हा कॅन्सर, प्राथमिक अवस्थेत (precancerous stage) ओळखला गेला व उपचार करता आले तर, १००% हा रोग टाळता येतो. या करिता १७ नोव्हेंबर २०२० रोजी, जागतिक आरोग्य परिषेदेने (WHO) ने एक विशेष प्रकल्प राबवण्यास सुरुवात केली. या प्रकल्पाअंतर्गत 'कॅन्सर मुक्त भारत २०३०' हे अभियान राबवण्यात येत आहे. सन २०३० पर्यंत भारत सर्व्हायकल कॅन्सरपासून मुक्त व्हावा म्हणून खालील उपक्रम राबवण्यात येत आहेत.

९ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलींना क्ष्ज्ञत तउउखछ्ए (क्ष्ज्ञत लसीकरण) देण्यात यावीत.

सर्व महिलांची गर्भाशयमुखाच्या कॅन्सरची स्क्रीनिंग चाचणी (cervical cancer screening) आयुष्यात किमान दोन वेळा तरी व्हावी, ३५ व्या वर्षी व ६५ व्या वर्षी. ज्या स्त्रियामध्ये स्क्रीनिंग चाचणीद्वारे दोष आढळल्यास तर त्यांना योग्य तो उपचार वेळेवर देण्यात यावा.

**pre cancerous अवस्था म्हणजे काय ?**

गर्भाशयमुखाचा कर्करोग हा क्ष्ज्ञत (ह्युमन पॅपीलोमा व्हायरस) या विषाणूमुळे होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात नुसार, वैवाहिक जीवन उपभोगणाऱ्या प्रत्येक स्त्रीला क्ष्ज्ञत (ह्युमन पॅपीलोमा व्हायरस) या विषाणूचा संसर्ग होऊ शकतो. बहुतांश स्त्रियांमध्ये हा विषाणू २-३ वर्ष राहून नाहीसा होतो. तर काही स्त्रियामध्ये हा विषाणू ८ ते १० वर्ष मुक्काम ठोकून गर्भाशय मुखाच्या पेशीमध्ये विशिष्ट प्रकारचे बदल घडवून आणतो. या पेशीतील बदलांना (pre cancerous lesion) म्हणतात. ह्या बदलांचे (pre cancerous lesion) पूर्ण कर्करोगात परिवर्तन होण्यात बराच कालावधी जातो. म्हणजेच ह्या बदलांचे (pre cancerous lesion) लवकरात लवकर निदान व उपचार झाल्यास पुढे होऊ घातलेला मोठा कर्करोग व त्यामुळे करावे लागणारे मोठे उपचार १००% टाळता येतील.

**कोणत्या स्त्रियांमध्ये याचा प्रादुर्भाव जास्त आढळतो?**

विशेतः लहान वयात लग्न झाले असल्यास व त्यामुळे लहान वयात सुरु झालेले लैंगिक संबंध, अनेक लोकांशी लैंगिक संबंध, अनेक वेळा झालेली बाळंतपणे, कुपोषित, गुप्तरोगी, धुम्रपान करणाऱ्या स्त्रिया व काही कारणामुळे इम्युनिटी कमी झालेल्या (HIV) स्त्रीयांना हा रोग होऊ शकण्याची शक्यता अधिक असते.

**या रोगाची लक्षणे कोणती?**

सर्व्हायकल कॅन्सर हा दिसून न येणारा व पटकन लक्षात न येणारा कॅन्सर आहे. कॅन्सर पूर्व प्राथमिक अवस्थेत (pre-cancer stage) साधारणतः सततचा पांढरा पदर जाणे, मासिक पाळीतील समस्या, किंवा स्त्री पुरुष लैंगिक संबधानंतर लागणारा लाल स्त्राव, इत्यादी लक्षणे दिसू शकतात. वैद्यकीय खर्च तसेच लाजरेपणा मुळे अनेक स्त्रिया या लक्षणांसाठी डॉक्टरकडे जाणे टाळतात. त्यामुळे हा कर्करोग प्राथमिक अवस्थेत (pre cancerous lesion) न लक्षात आल्याने व ओळखला न गेल्याने, कॅन्सरचे विषाणू शरीरात पसरून त्याचे रुपांतर मोठ्या कर्करोगात होते. म्हणूनच ही प्राथमिक (pre-cancerous) अवस्था शोधण्यासाठी साधारणतः विसाव्या वर्षापासून दर पाच वर्षांनी गर्भाशय मुखाची (SCREENING) तपासणी करणे गरेजेचे आहे.

**प्राथमिक अवस्था (pre cancerous) कशी अवस्था कशी ओळखता येईल?**

गर्भाशयमुखाशी स्त्रवणाऱ्या चिकट पातळ स्त्रावाचे MICROSCOPIC narjU (PP SMER) केल्यास प्री कॅन्सरस अवस्थे संदर्भात माहिती मिळू शकते. परंतु प्रत्येक ठिकाणी विशेतः खेडेगावी या तपासणीसाठीचे तंत्रज्ञान व तज्ञ उपलब्ध नसल्यामुळे ह्या तपासणीसाठी मर्यादा आहेत. परंतु 'कोल्पोस्कोपि'(COLPOSCOPY) ह्या आधुनिक तंत्राद्वारे हि प्राथमिक अवस्था अतिशय सोप्या पद्धतीने निदान करता येते. ह्या तपासणीत गर्भाशयमुखाला ॲसिटीक ॲसिड व ल्युगॉल आयोडीन नावाचे द्रव्य (SOLUTION) लाऊन कोल्पोस्कोपि नावाचे दुर्बिणी सारखे उपकरण योनिमार्गातून गर्भाशयमुखाची तपासणी करते. त्यासाठी कोणतीही भूल द्यावी लागत नाही किंवा टाकेही टाकावे लागत नाहीत. तसेच हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होण्याची सुद्धा गरज नसते. सोनोग्राफी सारखीच हि एक सहज व वेळ न लागणारी तपासणी आहे. गरज लागल्यास संशयित (SUSPICIOUS RE) जागेवरून, तुकडा तपासणीसाठी काढून पाठवता येतो. हे उपकरण पोर्टेबल असल्यामुळे ग्रामीण भागात देखील हे उपकरण घेवून जाऊन तपासणी करता येते.

**कॉल्पोस्कॉपि तपासणी कोणी करावी?**

लैंगिक जीवन उपभोगणाऱ्या प्रत्येक स्त्रीने सरासरी ३० वर्षानंतर, रजोनिवृत्ती झाल्या नंतरही परत रक्त स्त्राव सुरु झाल्यास, संभोगादरम्यान दुखत असल्यास किंवा रक्त येत असल्यास, गर्भनिरोधक गोळ्या जास्त दिवस घेतल्यास, मासिक पाळीच्या दरम्यान अतिरक्तस्त्राव झाल्यास किंवा मासिक पाळीचे इतर आजार व सततचा जाणारा योनी मार्गातील पांढरा स्त्राव असल्यास वरील कोल्पोस्कोपि यंत्राच्या द्वारे तपासणी करावी. ही तपासणी वयाच्या ३० ते ६५ वर्षापर्यंत करता येते.

तपासणी करताना जर रुग्णात कँसरची प्राथमिक अवस्था आढळल्यास बिना भूलेचे उपचार यावर करता येतो. या उपचारात, क्रायोथेरपी (थंड शेक) सारखे बाह्य रुग्ण विभागात करता येण्यासारख्या उपचारांचा समावेश होतो त्याच प्रमाणे LEEP सारख्या बिना बंधीकरण शस्त्रक्रियेचा देखील समावेश होतो. म्हणजेच छोट्या बिना बधीरीकरण उपचारांचा वापर करून होऊ घातलेला मोठा सर्व्हायकल CNCER व त्यासाठी लागणारे मोठे उपचार जसे गर्भाशयाची पिशवी काढणे (HYSTERCTOMY) सहजतेने टाळता येतील. ह्या द्वारे प्रत्येक व्यक्तीवर व पर्यायाने आरोग्य यंत्रणेवर येणारा उपचारांचा मानसिक, आर्थिक व शारीरिक भार कमी करता येईल. त्याच प्रमाणे ९ ते १४ वर्ष वयोगटातील मुलींचे (HPV VCCINE) लसीकरण ९० % पूर्ण केल्यास सर्व्हायकल कँसर (गर्भाशय मुखाचा कर्करोग) होण्यास प्राथमिक प्रतिबंध (PRIMRY PREVENTION) होऊ शकतो.

लक्षात ठेवा सर्व्हायकल कॅन्सर (गर्भाशय मुखाचा कॅन्सर) हा आजार त्याच्या प्राथमिक (pre-cancer) अवस्थेत लक्षात आल्यास यशस्वी उपचार करून तो टाळता येतो. चला तर मग या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जागतिक आरोग्य संघटनेच्या 'कॅन्सर मुक्त भारत २०३०' या अभियानाला आपण जोरदार प्रतिसाद देत, आपण आपल्या ९-१४ वर्ष वयोगटातील मुलीच्या (HPV VCCINTION) HPV लसिकरणाला व SCREENING FOR DETECTION OF ERLY CERVICL CNCER IN PRE CONCEROUS STGE या प्रकल्पाला स्त्रीरोग तज्ञांचा सल्ला घेऊन पाठींबा देऊयात. वर नमूद केलेल्या सर्व तपासण्या, उपचार, लसीकरण व त्यासाठीचे समुपदेशन 'जननी हॉस्पिटल' छत्रपती चौक, नांदेड येथे तज्ञांच्या मार्ग दर्शनाखाली केल्या जातात.

-डॉ. योगिनी श्रीवल्लभ कार्लेकर
नांदेड
मो. ९८१९१७८२२१

# रानाचा अग्नी पळस!

पळस बहरतो तेव्हा अख्खं रान पेटल्यासारखं भासतं. म्हणूनच कदाचित त्याला इंग्रजीमध्ये 'flame of the forest' म्हणत असतील.

थंडीचे दिवस संपून उष्ण काळ सुरू होण्याआधी ऋतूचक्राच्या आसाभोवती फिरणारी सृष्टीच जणू संक्रमणाच्या उंबरठ्यावर उभी असते. 'पळसाला पाने तिनच' ही म्हण फार प्रचलित आहे. म्हणींमध्ये जसा पळस वापरला जातो तसाच याचा उपयोग आयुर्वेदिक औषधींमध्येसुद्धा केला जातो.



तसं पाहायला गेलं तर पळस बहुगुणी आहे. अशा बहुगुणी पळसाची फुलं बहरल्यावर त्यातला रस पिण्यासाठी पळसावर पक्ष्यांची यात्राच भरते जणू. या पक्ष्यांमध्ये आघाडीवर असतात पळस मैना! निसर्गाच्या सोहळ्यात सहभागी होऊन फुलांचं परागीकरण करणाऱ्या पळसमैना पळसफुलांमधला रस पिऊन परागकण वाहून नेण्यास निसर्गाची एक प्रकारे मदतच करतात.

फार पूर्वी तर नाही म्हणता येणार पण अगदी आता आतापर्यंत होळीला पळस फुलांनी तयार केलेला रंग वापरत होते. कारण एक तर या रंगाला खूप उच्च दर्जाचा सुंगध यायचा आणि नैसर्गिक असल्यामुळे त्याचा शरीरावर तोटा कमी आणि फायदा जास्त होत होता.

'पूर्वी पळस बन हे गावाच्या अगदी जवळ असायचे. पळस बन खूप गर्द, अति दाट माजते आणि पळस फुलांच्या सुवासाने अस्सल नाग यामध्ये वावरतात, रमतात. नागासारखा रागीट विषारी सरपटणारा प्राणी गावाजवळ असणे हे गावातील लोकांसाठी अति धोक्याचं होते.

पळसाची अजून एक गोष्ट माझ्या नजरेत भरते ती म्हणजे प्रतिकूल परिस्थितीत असूनसुद्धा पळस बहरतो. न बोलता पण माणसाला खूप काही शिकवून जातो पळस!

पूर्वीचे लोकं आजच्या लोकांसारखे उच्चशिक्षित नसतीलही पण निसर्ग वाचन जन्मतः येत असल्यामुळेच आणि निसर्गाशी जुळवून घेतल्यामुळे कदाचित हे लोकं सुखी आणि समाधानी होते.

असा हा समृद्ध बहुगुणी पळस काळाच्या ओघात (अति शहरीकरणामुळे किंवा आपल्या उदासीनतेमुळे) नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. असचं होत राहिले तर जसं पळस नामशेष होऊन, पळस हा पुढच्या पिढीला फक्त चित्रामध्येच बघावा लागेल. पळस टिकला, बहरला तर कदाचित त्याला बघून आपली पुढची पिढी बहरेल. होळीच्या सणात वापरतात. एकूणच काय, तर वसंतारंभी फुलणारा आणि भर उन्हाळ्यातही लक्ष वेधून घेणारा पळस हा असा संदर्भसंपन्न असून त्याची मुळे लोकसंस्कृतीत खोलवर रुजलेली आहेत.

-रूचिरा बेटकर,
नांदेड
मो. ९९७०७७४२११

# १४ वर्षांच्या मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

## गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी नांदेड जिल्हा सज्ज

**नांदेड (प्रतिनिधी)** – महिलांमधील गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राज्यात विशेष एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, २८ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मोहिमेचा राष्ट्रीय स्तरावर शुभारंभ करण्यात आला असून, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या नियोजनाने जिल्ह्यात ही लस दि. ८ मार्चपासून राबविण्यात येणार आहे.आता जिल्ह्यात ही मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



**मोहिमेची ठळक वैशिष्ट्ये:** लक्ष्य गट – ज्या मुलींनी वयाची १४ वर्षे पूर्ण केली आहेत (१४ ते १५ वयोगटातील मुली) अशा सर्व मुलींना हे लसीकरण करण्यात येणार आहे. **एकच डोस पुरेसा:** या मोहिमेअंतर्गत 'क्वाड्रिव्हॅलेंट' एचपीव्ही लस दिली जाणार असून, या वयोगटातील मुलींसाठी लसीचा फक्त एकच डोस संरक्षणासाठी पुरेसा आहे.

**लसीकरण कोठे होईल ?:** हे लसीकरण सर्व सरकारी आरोग्य केंद्रांवर उपलब्ध असेल. **नोंदणी प्रक्रिया:** पालकांना पोर्टलवर स्वतःहून नोंदणी करता येईल किंवा लसीकरण केंद्रावर प्रत्यक्ष जाऊनही नोंदणीची सोय उपलब्ध आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग आणि लसीचे महत्त्व: भारतातील महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगामध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग हा दुसऱ्या क्रमांकाचा प्रमुख आजार आहे. ९९.७% प्रकरणांमध्ये हा कर्करोग 'ह्युमन पॅपिलोमा व्हायरस' च्या संसर्गामुळे होतो. प्रतिबंधात्मक लस घेतल्यास या कर्करोगापासून प्रभावी संरक्षण मिळू शकते.

**पालकांना आवाहन:** ही लस पूर्णपणे सुरक्षित आणि प्रभावी आहे. लसीकरणानंतर ३० मिनिटे आरोग्य केंद्रावर थांबणे आवश्यक आहे. काही वेळा हलका ताप किंवा इंजेक्शन दिलेल्या जागी थोडे दुखणे यांसारखी किरकोळ लक्षणे दिसू शकतात, जी २-३ दिवसांत आपोआप बरी होतात. आपल्या मुलीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी सर्व पालकांनी या मोहिमेत सहभागी होऊन आपल्या १४ वर्षांच्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर संगीता देशमुख व जिल्हा सल्ला चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.

### गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा, साठवणूक करणाऱ्या माफियावर

# नांदेड ग्रामीण पोलिसांचा छापा; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या जुना गंगाबेट येथे नदीतून अवैधरित्या वाळू उपसा करून साठवणूक करीत असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून छापा कारवाई केली असता चार इसम पळून गेले. या कारवाईत पाच तराफे व साठवलेली दहा ब्रास रेती जप्त करून ३ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतूक करणाऱ्या लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, हे दिनांक ७ मार्च रोजी वरील अधिकारी अंमलदार यांचे गुन्हा उघडकीस अणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, पोहेकॉ., पोकॉ. समीर अहेमद, पोकॉ. मारोती पचलिंग, पोकॉ. सचिन चावरे, पोकॉ. शंकर माळगे यांच्यासह पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, जुने गंगाबेट गोदावरी नदीपात्राचे किणाऱ्यावर काही इसम नदीतून अवैध रेती उपसा करून रेती साठवून ठेवत आहेत. या गोपनीय माहितीवरून वरील अधिकारी व अंमलदार असे दोन पंचांसोबत मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी दोन वाजताचे सुमारास छापा मारला असता पोलिसांना पाहुन या घटनेतील चार आरोपी तेथून पळून गेले. सदर नदीपात्रात असलेले पाच तराफे व त्यातील रेती जागीचे तराफे तोडून व जाळून नष्ट केले. तसेच नदीकाठी उपसा करून साठवून ठेवलेली १० ब्रास रेती दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करून दुसऱ्या वाहनात टाकून पो. स्टे.ला आणून जमा केली.

या घटनेतील आरोपीविरुद्ध कलम ३०३ (२), ३ (५) भा. न्या.सं. सह कलम ४८ (७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेतकऱ्याची दोन्ही मुले पोलीस उपनिरीक्षक

**शंकरनगर (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील भोपाळा हे गाव आज शिक्षण व स्पर्धा परीक्षांमधील यशामुळे समाजासमोर आदर्श ठरत आहे. या गावातील एका शेतकरी कुटुंबातील दोन्ही मुलांनी पोलीस उपनिरीक्षक पद मिळविले आहे.

भोपाळा गावातील गजानन व्यंकटराव तोटेवाड हे सध्या पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत आहेत. त्याचबरोबर त्यांचे धाकटे बंधू रवी व्यंकटराव तोटेवाड यांनी नुकत्याच लागलेल्या निकालात यश मिळवत पोलीस उपनिरीक्षकपद मिळवले आहे. त्यामुळे एका शेतकरी कुटुंबातील दोन्ही मुलांनी पोलीस अधिकारी होण्याचा मान मिळविल्याने गावासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे. रवी तोटेवाड यांनी यापूर्वी काही नोकऱ्या



सोडून स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू ठेवली होती. कुटुंबात आधीपासूनच पोलीस सेवेतील अधिकारी होण्याची प्रेरणा असल्याने मोठ्या भावाप्रमाणेच पोलीस सेवेत अधिकारी होण्याचा त्यांचा निर्धार होता. त्या जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी अखेर पीएसआय पद मिळवले. तोटेवाड कुटुंबातील आणखी एक भाऊ महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असल्याने या कुटुंबातील चारही भावंडे सेवाक्षेत्रात कार्यरत आहेत.

भोपाळा हे गाव दिवसेंदिवस नवे आदर्श निर्माण करत समाजाला तसेच परिसरातील विद्यार्थ्यांना सकारात्मक दिशा देत आहे. काही वर्षांपूर्वी गावात मोजकेच कर्मचारी सरकारी सेवेत होते. मात्र मागील एक-दोन दशकांत गावातील तरुणांनी शिक्षण व स्पर्धा परीक्षांमध्ये मोठी प्रगती केली आहे.

आजघडीला या गावातील युवक विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. त्यामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक, वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापक, अभियंते, डॉक्टर, वकील, शिक्षक, मिलिटरी, आरोग्य विभाग, आयकर विभाग, जीएसटी विभाग, महाराष्ट्र सुरक्षा दल, लेखा परीक्षण विभाग तसेच विविध खाजगी कंपन्यांमध्येही अनेक युवक कार्यरत आहेत.

# नेसुबो महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांची राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचा संघ दि. १० ते १४ मार्च दरम्यान असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय राष्ट्रीय युवक महोत्सवात सहभागी होणार आहे.

हा महोत्सव सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई येथे संपन्न होणार असून, या स्पर्धेसाठी नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील स्वाती कंधारे, संदीप कोडापे, रितेश मडावी, पीयूष तोडसाम, गणेश कदम आणि चिन्मय मठपती या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी पात्रता मिळवली आहे. तसेच या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संदीप काळे यांची संघ व्यवस्थापक म्हणून निवड करण्यात आली आहे.

नोव्हेंबर २०२५ मध्ये एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या आंतरराज्यस्तरीय युवक महोत्सवात स्वाती कंधारे हिने क्रिएटिव्ह डान्स, मूक अभिनय आणि विडंबन या तीन स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळवली. चिन्मय मठपती याने शास्त्रीय सुरवाद्य या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला, तर गणेश कदम याने लोकसंगीत या प्रकारात पारितोषिक पटकावले. तब्बल २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी पात्र ठरलेल्या लोकनृत्य स्पर्धेत संदीप कोडापे,



रितेश मडावी आणि पीयूष तोडसाम यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर स्थान मिळवले आहे.

या यशाबद्दल अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे, संस्थेच्या सचिव ॲड. वनिताताई जोशी, कोषाध्यक्ष कैलाशचंद काला, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुग्रीव फड, डॉ. एम. वाय. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. मनीष देशपांडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दत्ता बडूरे, एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट डॉ. किशोर इंगळे, डॉ. मीनाक्षी बांगर, डॉ. संतोष कोटूरवार, डॉ. आनंद आष्टूरकर, प्रा. किरण वाघमारे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भागवत सुनेवाड यांच्या 'सांग ना गं आई' संग्रहाचे प्रकाशन

**नांदेड (प्रतिनिधी)** – अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथील जिल्हा परिषद हायस्कूलमधील उपक्रमशील शिक्षक भागवत सुनेवाड लिखित 'सांग ना गं आई' या बालकविता संग्रहाचे प्रकाशन नांदेड येथे पार पडलेल्या २० व्या विद्रोही साहित्य संमेलनात करण्यात आले.



या बालकविता संग्रहाचे प्रकाशन संमेलनाध्यक्ष व प्रसिद्ध साहित्यिक लोकनाथ यशवंत, विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्य अध्यक्षा प्रतिमा परदेशी तसेच डॉ. अनंत राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक रावसाहेब पपूलवाड आणि डॉ. हेमंत कार्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना संमेलनाध्यक्ष लोकनाथ यशवंत यांनी सांगितले की, भागवत सुनेवाड यांच्या बालकविता मुलांच्या भावविश्वाशी समरस होणाऱ्या असून, त्या त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणाऱ्या आणि भावविश्व समृद्ध करणाऱ्या आहेत. भागवत सुनेवाड हे जिल्हा परिषद हायस्कूल, मालेगाव येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असून ते तंत्रस्नेही व उपक्रमशील शिक्षक म्हणूनही ओळखले जातात.

# शेळगाव गौरीच्या आणखी एका विद्यार्थ्याचे यश

## डॉ. नंदेश्वर गोपीनाथ बळेगावे 'एम्स'मध्ये रुजू

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात नावारूपाला आलेल्या आणि दोन वेळा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शेळगाव गौरी गावातील डॉ. नंदेश्वर गोपीनाथ बळेगावे या विद्यार्थ्याने उज्ज्वल यश संपादन केले आहे.

संपूर्ण देशांतर्गत घेण्यात आलेल्या एम्स परीक्षेत एकूण १००० विद्यार्थ्यांमध्ये देशात पाचवा रँक संपादन करून झारखंड राज्यात देवघर येथील एम्स हॉस्पीटलमध्ये रुजू झाला. त्याचे प्राथमिक शिक्षण कै. रामचंद्र पाटील विद्यालय, शेळगाव गौरी येथे तर उच्च माध्यमिकचे शिक्षण संत ज्ञानेश्वर विद्यालय, धुप्पा येथे झाले आहे. महाविद्यालयीन शिक्षण नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात संपन्न झाले. डॉ. नंदेश्वरच्या यशाबद्दल महाराष्ट्र राज्याच्या ग्रामस्वच्छता समितीचे



प्रथम अध्यक्ष माधवराव पाटील शेळगावकर यांनी कौतुक केले आहे. प्राचार्य संजय पाटील शेळगावकर, प्राचार्य सरोज पाटील शेळगावकर, मोतीराम पाटील शिंपाळे, उत्तमराव पाटील, मुख्याध्यापक अशोक पाटील बावणे, राजेंद्र पाटील, विजय पाटील, माधव घाटोळे, माधव वाढवणे, हुसेनसाहब, संभाजी माली पाटील, नवनाथ शिंपाळे, तुकाराम वाघमारे यांच्यासह संपूर्ण गावकऱ्यांनी कौतुक केले आहे.

# स्वारातीम विद्यापीठात कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचा शुभारंभ

**नांदेड**–स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राच्या वतीने विद्यापीठ परिसर तसेच उपपरिसरांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यात वृद्धी करून त्यांना बाजारपेठेतील गरजांनुसार तयार करणे. सॉफ्ट स्किल्स व व्यक्तिमत्व विकास यावर विशेष भर दिल्या जात आहे. केवळ तांत्रिक ज्ञानच नव्हे, तर संवाद कौशल्य आणि प्रभावी व्यक्तिमत्व घडवण्यावर विशेष भर. विद्यापीठ मुख्य परिसरातील सर्व संकुल तसेच उपपरिसरातील विविध विभागांतील विद्यार्थ्यांचा यात सहभाग.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांना केवळ पदवी न देता, त्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात लागणारी कौशल्ये आत्मसात करून देणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या कल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यावसायिक प्रगतीसाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. अशी माहिती कौशल्य विकास केंद्राचे संचालक डॉ. सुरेंद्र जी. गट्टानी यांनी यावेळी दिली.

# अखंड शिवनाम सप्ताहानिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)** –थोटवाडी येथे अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तेव्हा परिसरातील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन थोटवाडी येथील गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

मुखेड तालुक्यातील थोटवाडी येथे गुरुवार, दि. ५ मार्च ते १२ मार्च दरम्यान अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परम रस्य पारायण सोहळ्यानिमित्त शिवपाठ, परमरस्य पारायण, गाथा भजन, पोथी वाचन, शिवपाठ, शिवकीर्तन, शिव जागरण आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहामध्ये शि.भ.प. सौ. स्वातीताई दापकेकर, शि.भ.प. लक्ष्मण चवळे महाराज शेलदरकर, शि.भ.प. विकास महाराज धसवाडी, अमोल महाराज बनवस, शि.भ.प. संगमेश्वर महाराज बिरादार, शि.भ.प. शिवानंद हैबतपुरे उदगीर, शि.भ.प. भगवंतराव पाटील चांभरगेकर यांचे रात्रीचे कीर्तन तर शि.भ.प. कोमलताई संपत्ती हात्ती यांचे टाळ आरतीचे तसेच शि.भ.प.श्री १०८ दिगंबर शिवाचार्य महाराज वसमत यांचे प्रसादाचे कीर्तन होणार आहे.

यावेळी पारायण प्रमुख सूर्यकांत पाटील, मारोती पाटील, मल्लिकार्जुन पाटील, शंकर पाटील, साकेत पाटील, वादक म्हणून तुकाराम पांचाळ चांडोळा, पुंडा कामजे, लक्ष्मण गोंदलवाड, माधव भूत्तापल्ले, गायक म्हणून बाबू पाटील चांडोळ, भास्कर पाटील चांडोळ, संभाजी पांचाळ, श्रीमंत शेकापूरकर, राजू महाराज भुत्तापल्ले, व्यंकट निर्णे, विठ्ठल बाजगीरे, माधव घुळे, संजय ईबितदार, वाल्मीक भुत्तापल्ले, सुभाष नेन्ताबाजे, प्रकाश रेनगुंटवार, अंकुश म रतुळे, रवी पाटील, वैजनाथ कल्पे, गोविंद रोकडे, बालाजी अवधूते, हार्मोनियम वादक म्हणून मारोती पाटील, हुल्लप्पा बाजगीरे, बापूराव पाटील तरगुडे, गाथा प्रमुख तानाजी पाटील, रमेश पाटील, अशोक पाटील, प्रल्हाद निर्णे, वैजनाथ साताळे, हावगीराव निर्णे, व्यंकट पाटील, शिवपाठ प्रमुख म्हणून उमाकांत पाटील, सौ. सरस्वती पाटील, सौ. विमलबाई पाटील, सौ. प्रयागबाई मनोहर पाटील, सौ. अनुसया साताळे, विमलबाई पाटील, सौ. मुन्नीताई नेन्ताबाजे, सौ. उज्वलाबाई जिरगे तसेच विणेकरी प्रमुख गणेश पाटील, दत्तात्रय साताळे, स्वप्निल पाटील, भानुदास साताळे, नागेश पाटील, रोहित पाटील आदी गायक, वादक उपस्थित राहणार आहेत.

# अर्धापूर न. पं. थकीत कर वसुलीसाठी मुख्याधिकारी जगदीश दळवी रस्त्यावर



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – शहरातील नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी नगरपंचायतीकडून मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकीदारांविरोधात विशेष धडक वसुली मोहीम राबविण्यात येत आहे. शनिवार, दि. ७ मार्च रोजी सुट्टी असुनसुद्धा मुख्याधिकारी वसुली मोहिमेत सहभागी झाले आहेत. थकीत कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांवर कठोर कारवाई सुरू करण्यात आली असून काही ठिकाणी नळ कनेक्शन सील करण्याची कारवाई करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी दिली आहे.

नगरपंचायतीकडे मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी प्रलंबित असल्यामुळे महसूल विभागामार्फत विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांकडून शहरातील विविध भागांमध्ये जाऊन थकबाकीदारांना नोटिसा देणे, प्रत्यक्ष भेट देऊन कर भरण्यासाठी आवाहन करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्याचे काम सुरू आहे.

नगरपंचायत प्रशासनाने थकबाकीदारांना वारंवार नोटिसा देऊनही कर भरणा न केल्यामुळे आता कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये थकबाकीदारांच्या मालमत्ता व नळ कनेक्शन सील करणे, आवश्यकतेनुसार मालमत्ता जप्तीची प्रक्रिया सुरू करणे तसेच इतर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

नगरपंचायतीकडून राबविण्यात येणाऱ्या या विशेष मोहिमेमुळे शहरातील कर वसुलीमध्ये वाढ होत असून, काही दिवसांतच लाखो रुपयांची वसुली करण्यात प्रशासनाला यश आले आहे. या वसुलीतून मिळणारा निधी शहरातील रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा व्यवस्था, स्वच्छता, सार्वजनिक प्रकाश व्यवस्था, उद्याने तसेच इतर नागरी सुविधा सुधारण्यासाठी वापरण्यात येणार आहे. दरम्यान, नागरिकांना कर भरण्यासाठी नगरपंचायत कार्यालयात तसेच ऑनलाईन माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने आपली थकबाकी भरून कारवाई टाळावी, असे आवाहन नगरपंचायत प्रशासनाने केले आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मुख्याधिकारी जगदीश दळवी म्हणाले की, नगरपंचायत अर्धापूर हद्दीतील मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकीदारांविरुद्ध विशेष वसुली मोहीम राबविण्यात येत आहे. थकबाकीदारांनी कारवाई टाळण्यासाठी तत्काळ थकीत कर भरणा करून प्रशासनाला सहकार्य करावे अन्यथा नियमानुसार नळ कनेक्शन सील करणे, मालमत्ता जप्ती आदी कठोर कारवाई करण्यात येईल. अशी माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना नगरपंचायतीचे मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी दिली आहे. वसुली पथकात स्वच्छता निरीक्षक कैलास देशमुख, टॅक्स ऑफिसर विश्वासू चिल्केवार राजवीर सौदा, राजू पतंगे, बालाजी पाटोळे, राजकिरण साखरे यांच्यासह नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

# महिला दिनानिमित्ताने वृत्तपत्र विक्रेत्या वंदना लोणे यांचा सन्मान

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मराठवाड्यातील एकमेव महिला वितरक व सिडको परिसरातील कार्यरत वृत्तपत्र विक्रेता वंदना लोणे यांचा नवीन नांदेड मराठी पत्रकार संघ व सिडको वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने सिडको येथे सत्कार करण्यात आला.



गेल्या पंधरा वर्षांपासून वर्षभरात उन्हाळा, पावसाळा व हिवाळ्यात स्वतः पायी चालत, अनेक भागातील विविध गल्ली बोळात दैनंदिन जवळपास सहा ते सात किलोमीटर अंतर पार करत विविध दैनिके वाचकांच्या निवासस्थानी पोहचविण्याचे काम करतात, पुरूषांच्या बरोबरीने महिला सुध्दा कमी नाहीत हे महिला वितरक लोणे यांनी दाखवून दिले आहे, त्यामुळे त्यांनी केलेल्या कामाची दखल घेत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी फेटा बांधून व शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण देशमुख, कार्याध्यक्ष रमेश ठाकूर, कोषाध्यक्ष सारंग नेरलकर, सहसचिव तिरूपती पाटील घोगरे, वृत्तपत्र संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सतीश कदम, दिलीप ठाकूर, बालाजी सुताडे व लोकमत वितरणचे सुधाकर काकडे, गणेश डोळस, अमोल नांदेडकर, तातेराव वाघमारे, श्रीराम धांवडे, धुव्र लोणे, गजानन धावंडे, गणेश ठाकूर, महेश सुताडे यांच्यासह वृत्तपत्र विक्रेता बांधव उपस्थित होते.

या वेळी मिठाई वाटप करून जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# अष्टूर जि. प. हायस्कूलचे एन.एम.एम.एस. परीक्षेत यश

**नांदेड (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील अष्टूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलने नुकत्याच झालेल्या एन.एम.एम.एस. (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या या परीक्षेत शाळेतील तब्बल आठ विद्यार्थी पात्र ठरले असून, शाळेच्या गुणवत्तेचा आलेख अधिक उंचावला आहे.

आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांसाठी एन.एम.एम.एस. परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळते. अष्टूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलने गेल्या काही वर्षांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देत एकच ध्यास गुणवत्तेचा विकास हा उपक्रम राबवला असून, त्याचे फलित या यशातून दिसून आले आहे. या परीक्षेत अक्षरा विनोद बाबर, रितिका रुस्तुम शिंदे, नेहा काशिनाथ चव्हाण, अनुष्का गोविंद लिंगायत, प्रथमेश दिलीप तेलंगे, अबुजर दस्तगीर शेख, गणेश बुद्धाजी बंडे आणि सोहम काशिनाथ जामकर या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शाळेत सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक शिवाजी टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वसंत लुंगारे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेची उत्कृष्ट तयारी करून दिली.

# प्रगतीमंत्र

## लॉयर आणि ॲडव्होकेटमध्ये काय फरक आहे?



### न्यायालयात खटला कोण लढू शकतो? फरक जाणून घ्या...

**कायद्याच्या जगात लॉयर आणि ॲडव्होकेट हे शब्द अनेकदा परस्पर बदलण्यायोग्य वापरले जातात. बरेच लोक त्यांना समान मानतात, परंतु त्यांच्यात फरक आहे. दोघेही कायद्याचे विद्यार्थी आहेत, परंतु त्यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या वेगळ्या आहेत. तर चला लॉयर आणि ॲडव्होकेट यांच्यातील फरक समजून घेऊया. खटले चालवण्यासाठी कोण अधिकृत आहे किंवा कायदेशीर बाबींसाठी कोणाचा सल्ला घ्यावा लागतो...**

» लॉयर कोण असतो? : 'लॉयर' हा शब्द सामान्यतः वकिलासाठी वापरला जातो. लॉयर म्हणजे असा व्यावसायिक ज्याने कायद्याचा अभ्यास केला आहे आणि कायद्याची पदवी (LLB) प्राप्त केली आहे. लॉयर कायदेशीर बाबींवर क्लायंटना सल्ला देऊ शकतात आणि कागदपत्रे तयार करू शकतात. तथापि, लॉयर थेट न्यायालयात खटले चालवू शकत नाहीत. यासाठी त्यांना बार कौन्सिल ऑफ इंडियाची परीक्षा उत्तीर्ण होणे आणि परवाना घेणे आवश्यक आहे.

» ॲडव्होकेट कोण आहे? : ॲडव्होकेट म्हणजे असे लोक ज्यांना बार कौन्सिल ऑफ इंडियाने परवाना दिला आहे. त्यांनी बार परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि ते दिवाणी, फौजदारी किंवा संवैधानिक बाबींमध्ये बोलू शकतात. ॲडव्होकेटचे काम केवळ कायदेशीर सल्ला देणे नाही तर न्यायालयात खटल्यांचे प्रतिनिधित्व करणे, खटले लढवणे आणि न्यायाधीशांसमोर युक्तिवाद सादर करणे देखील आहे.

» न्यायालयात कोण युक्तिवाद करू शकतो? : बार कौन्सिलमध्ये नोंदणीकृत वकीलच न्यायालयात एखाद्या व्यक्तीचे प्रतिनिधित्व करू शकतात.

### लॉयर आणि ॲडव्होकेटमध्ये काय फरक?

» सर्व ॲडव्होकेट वकील असतात, परंतु सर्व वकील ॲडव्होकेट नसतात.

» लॉयर म्हणजे असे लोक ज्यांनी एलएलबी पदवी मिळवली आहे परंतु बार कौन्सिलकडून परवाना मिळालेला नाही.

» ॲडव्होकेट म्हणजे असे लोक ज्यांनी केवळ एलएलबी मिळवले नाही तर बार कौन्सिलची परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि परवाना मिळवला आहे.

» लॉयर सल्ला देऊ शकतात आणि कायदेशीर कागदपत्रे तयार करू शकतात, परंतु ॲडव्होकेटच न्यायालयात हजर राहून केसेसवर युक्तिवाद करण्यास पात्र आहेत.

» आणखी एक फरक म्हणजे प्रमाणपत्र. ॲडव्होकेटची नोंदणी बार कौन्सिलमध्ये केली जाते, तर केवळ कायदेशीर सल्लागार म्हणून काम करणाऱ्या लॉयर्सना असे करण्याची आवश्यकता नसते.

## 32 बनावट विद्यापीठांची यादी यूजीसीने केली जाहीर!

**विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पुन्हा एकदा देशात कार्यरत असलेल्या बनावट विद्यापीठांची यादी जाहीर केली आहे. १२ राज्यांमध्ये अशा बत्तीस विद्यापीठांची ओळख पटवण्यात आली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या सुरक्षिततेबद्दल आणि उच्च शिक्षणाच्या विश्वासार्हतेबद्दल नवीन चिंता निर्माण झाल्या आहेत. यूजीसीने विद्यार्थ्यांना आणि पालकांना सावधगिरी बाळगण्याचा आणि यूजीसी कायद्याअंतर्गत मान्यता नसलेल्या आणि वैध पदवी प्रदान करण्याचा अधिकार नसलेल्या संस्थांमध्ये प्रवेश टाळण्याचा सल्ला दिला आहे. यूजीसीने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीवरून असे दिसून येते की गेल्या दोन वर्षांत अशा संस्थांची संख्या २२ वरून ३२ झाली आहे, जे अनधिकृत विद्यापीठांच्या वाढत्या व्याप्तीचे प्रतिबिंब आहे. यादीत समाविष्ट झालेल्या नवीन राज्यांमध्ये हरियाणा, राजस्थान, झारखंड आणि अरुणाचल प्रदेश यांचा समावेश आहे, ज्या प्रत्येकाने एक बनावट विद्यापीठ नोंदवले आहे.**

### विद्यार्थी बनावट विद्यापीठे कशी टाळू शकतात?

उच्च शिक्षणाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी बनावट विद्यापीठे ओळखणे अत्यावश्यक झाले आहे. प्रवेशापूर्वी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची मान्यता तपासली पाहिजे. वेबसाइट डोमेन काळजीपूर्वक तपासले पाहिजे. अधिकृत वेबसाइटवर सहसा https, edu.in किंवा ac.in असते. फी संरचना, माहिती बुलेटिनमधील त्रुटी, मान्यता पत्र, NAAC ग्रेड आणि स्थान तपासून बनावट विद्यापीठे ओळखता येतात.

### राज्य अन् बनावट विद्यापीठाचे नाव

» आंध्र प्रदेश : क्राइस्ट न्यू टेस्टामेंट डीम्ड युनिव्हर्सिटी
» आंध्र प्रदेश : बायबल ओपन युनिव्हर्सिटी ऑफ इंडिया
» अरुणाचल प्रदेश : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह मेडिसिन
» दिल्ली : वर्ल्ड पीस ऑफ युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटी (डब्ल्यूपीयूएनयू)
» दिल्ली : इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड इंजिनिअरिंग, कोटला मुबारकपूर
» दिल्ली : ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक अँड फिजिकल हेल्थ सायन्सेस (एआयआयपीएचएस) अलीपूर
» दिल्ली : कमर्शियल युनिव्हर्सिटी लिमिटेड, दर्यागंज
» दिल्ली : युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटी, दिल्ली
» दिल्ली : प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, दिल्ली
» दिल्ली : एडीआर-फोकस्ड ज्युडिशियल युनिव्हर्सिटी, राजेंद्र प्लेस
» दिल्ली : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड इंजिनिअरिंग
» दिल्ली : विश्वकर्मा ओपन युनिव्हर्सिटी फॉर सेल्फ-एम्प्लॉयमेंट
» दिल्ली : आध्यात्मिक विद्यापीठ (अध्यात्मिक विद्यापीठ), रोहिणी
» हरियाणा : मॅजिक ॲन्ड आर्ट विद्यापीठ, फरिदाबाद
» झारखंड : दक्ष विद्यापीठ, रांची
» कर्नाटक : सर्व भारतीय शिक्षा पीठ, विजयनगर, तुमकूर
» कर्नाटक : ग्लोबल ह्युमन पीस युनिव्हर्सिटी, बेंगळुरू
» केरळ : इंटरनॅशनल इस्लामिक युनिव्हर्सिटी ऑफ प्रोफेटिक मेडिसिन (IIUPM), कोझिकोड
» केरळ : सेंट जॉन युनिव्हर्सिटी, किशनट्टम
» महाराष्ट्र : राजा अरबी विद्यापीठ, नागपूर
» महाराष्ट्र : राष्ट्रीय मागास कृषी विद्यापीठ, तडवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
» नवी दिल्ली : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सोल्युशन्स, जनकपुरी
» नवी दिल्ली : माउंटन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, नेहरू प्लेस
» पुद्दुचेरी : उषा लुच्युमनन कॉलेज ऑफ एज्युकेशन, तिरुक्कन्नूर
» पुद्दुचेरी : श्री बोधी अकादमी ऑफ हायर एज्युकेशन, पुद्दुचेरी
» राजस्थान : राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, भिवडी, जिल्हा अलवर
» उत्तर प्रदेश : गांधी हिंदी विद्यापीठ, प्रयाग, अलाहाबाद
» उत्तर प्रदेश : नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यापीठ (मुक्त विद्यापीठ), अचलताल, अलीगढ
» उत्तर प्रदेश : भारतीय शिक्षा परिषद, भारत भवन, मटियारी चिन्हाट, फैजाबाद रोड, लखनौ
» उत्तर प्रदेश : महामाया टेक्निकल युनिव्हर्सिटी, नोएडा
» पश्चिम बंगाल : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह मेडिसिन, कोलकाता
» पश्चिम बंगाल : इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह मेडिसिन ॲन्ड रिसर्च, कोलकाता



## 35 च्या वयात सुरू केली यूपीएससीची तयारी, 40 व्या वर्षी आयएएस बनली निसा!

**जर तुमच्याकडे दृढनिश्चय असेल तर कोणतेही स्वप्न पूर्ण होऊ शकते. केरळमधील निसा उन्नीराजन यांची कहाणी आपल्याला याची जाणीव करून देते. निसा विवाहित आहेत. त्यांना दोन मुली आहेत. घर सांभाळण्याची जबाबदारी, शिवाय श्रवणदोषही... तरीही निसा यांनी वयाच्या ३५ व्या वर्षी असा निर्णय घेतला की त्यांच्या कुटुंबालाही आश्चर्य वाटले. मुली लहान असल्या तरी त्यांनी यूपीएससीची तयारी सुरू करण्याचा निर्णय घेतला. ते सोपे नव्हते. दिवसा घरातील कामे आणि रात्री अभ्यास, असा दिनक्रम सुरू झाला... पती अरुण आणि कुटुंबानेही त्यांना पाठिंबा दिला...**

> “मी कधीही माझ्या कोणत्याही प्रयत्नांना वाया घालवले असे मानले नाही. प्रत्येक प्रयत्नाने मला काहीतरी नवीन शिकवले.
> **– निसा उन्नीराजन**

निसा यांना श्रवणदोष होता. तरीही त्यांनी हार मानली नाही. कठोर परिश्रम करत राहिल्या. त्यांनी सहा वेळा परीक्षा दिली आणि अपयशी ठरल्या. परंतु काहीतरी साध्य करण्याचा दृढनिश्चय होता. अखेर सातव्या प्रयत्नात निसा यांनी २०२४ च्या यूपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन सुमारे १००० वा क्रमांक मिळवला. हे त्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि दृढनिश्चयाचे फळ होते. निसा उन्नीराजन यांनी एका मुलाखतीत खुलासा केला की त्यांनी तिरुवनंतपूरममधील एका कोचिंग सेंटरमधून मार्गदर्शन घेतले. तिची खरी प्रेरणा यशस्वी यूपीएससी उमेदवारांच्या प्रेरणादायी कथा आणि प्रेरक व्हिडिओ होते. अभ्यासाची वेगळी पद्धत स्वीकारली आणि ती तिच्यासाठी कामी आली. तिने कोट्टायमचे उपजिल्हाधिकारी रणजीत यांच्याकडून प्रेरणा घेतली, ज्यांनी देखील अशाच एका आव्हानावर मात केली आणि यश मिळवले होते.

# बिझनेस

## दुबईत राहणं परवडते का भाऊ?

**दुबई सध्या बातम्यांमध्ये आहे. लक्झरी राहणीमानासाठी प्रसिद्ध असलेले हे यूएई शहर सध्या मध्य पूर्वेत तणाव अनुभवत आहे. इराणने दुबईवर काही हल्ले केले आहेत. दरम्यान, अजूनही बरेच लोक दुबईत राहण्याचे आणि स्थायिक होण्याचे स्वप्न पाहतात. चार्टर्ड अकाउंटंट (सीए) नितीन कौशिक यांची एक सोशल मीडिया पोस्ट चर्चेचा विषय बनली आहे.**

दुबईमध्ये ३,००० दिरहम (अंदाजे ७४,००० रुपये) मासिक पगार पहिल्या दृष्टीक्षेपात आकर्षक वाटू शकतो, परंतु प्रत्यक्षात तो स्वप्नापेक्षा कर्जाचा सापळा ठरू शकतो. दुबईमध्ये खासगी खोली मिळणे जवळजवळ अशक्य आहे. फक्त बेड स्पेस (६ ते १० लोकांसाठी असलेली खोली) १,२०० ते १,५०० दिरहम खर्च करते. ही खोली मासिक उत्पन्नाच्या निम्मी आहे. दुबईमध्ये वाहतुकीचा खर्च देखील लक्षणीय आहे. मेट्रो पास किंवा खासगी कार-लिफ्ट सेवेसाठी दरमहा ३५० ते ५०० दिरहम खर्च येतो. घरगुती स्वयंपाक (किराणा सामान), मोबाईल प्लॅन आणि कपडे धुणे यामध्ये अंदाजे १,००० दिरहम खर्च होतात. अशा प्रकारे, संपूर्ण मासिक भत्ता खर्च होतो, ज्यामुळे शिल्लक शून्य राहते. याचा अर्थ, कोणतीही बचत होत नाही.

### तडजोड करावी लागू शकते

जर एखाद्या व्यक्तीला भारतात त्यांच्या कुटुंबाला पैसे पाठवण्यासाठी ३५ हजार रुपये (सुमारे १४०० दिरहम) वाचवायचे असतील तर त्यांना त्यांचा मासिक खर्च १६०० दिरहमपर्यंत कमी करावा लागेल. कौशिकच्या मते, हे फक्त तेव्हाच शक्य आहे जेव्हा ते त्यांचे अन्न सेवन कमी करतात किंवा अत्यंत गरीब आणि बेकायदेशीर, गर्दीच्या भागात राहतात.

### दुबईमध्ये राहणे किती वेगळे?

भारतात कमी पगार असूनही, कुटुंबाचा आधार आणि सामाजिक सुरक्षा आहे, जी दुबईतील स्थलांतरित कामगारांना नसते. कौशिक म्हणाले, की दुबईतील अनेक प्रवेशस्तरीय क्षेत्रांमध्ये (जसे की सुरक्षा, किरकोळ विक्री आणि वितरण) पगार अनेक वर्षांपासून जवळजवळ स्थिर राहिले आहेत, तर राहणीमान आणि अन्नाचा खर्च वाढत आहे. गणित जुळले नाही तर परदेशात जाण्याचा निर्णय शहाणपणाचा ठरणार नाही.

## या हैदराबादी अभियंत्याला 444 कोटी रुपये पगार, दिग्गज कंपनीचे आहेत प्रमुख

**शांतनु नारायण हे जवळजवळ दोन दशकांपासून ॲडोबचे सीईओ आहेत. हैदराबादमध्ये जन्मलेले आणि शिक्षण घेतलेले शांतनु आज सिलिकॉन व्हॅलीतील सर्वात प्रभावशाली अधिकाऱ्यांपैकी एक आहेत. ते १९८० च्या दशकात शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या आणि नंतर जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांना आकार देणाऱ्या भारतीय अभियंत्यांच्या पिढीचे प्रतिनिधित्व करतात. हैदराबादमधून बाहेर पडून एका आघाडीच्या तंत्रज्ञान कंपनीचे प्रमुख होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास कौतुकास्पद आहे. GQ इंडियाच्या मते, २०२४-२५ आर्थिक वर्षात त्यांचा पगार अंदाजे $५२ दशलक्ष (अंदाजे ४४४ कोटी रुपये) होता. त्यांच्या यशाच्या प्रवासाबद्दल येथे जाणून घेऊया...**



शांतनु नारायण यांचा जन्म २७ मे १९६३ रोजी हैदराबादमध्ये एका तेलुगू हिंदू कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचा प्लास्टिकचा व्यवसाय होता. त्यांची आईने अमेरिकन लिटरेचर शिकवत होत्या. घरात व्यवसायासोबतच पाश्चात्य लेखन आणि संस्कृतीचे मिश्रण होते. शांतनु यांनी हैदराबाद पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेतले. मनोरंजक म्हणजे, मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नाडेला देखील याच शाळेचे विद्यार्थी होते. शांतनु नारायण यांनी उस्मानिया विद्यापीठाच्या युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन इंजिनिअरिंगमध्ये बॅचलर पदवी मिळवली.

### पुढील अभ्यासासाठी अमेरिकेत

त्यांच्या पिढीतील अनेक अभियंत्यांप्रमाणे शांतनू यांनीही उच्च शिक्षणासाठी पाश्चिमात्त्य देशांकडे पाहिले. १९८० च्या दशकाच्या मध्यात ते अमेरिकेत गेले. तिथे त्यांनी १९८६ मध्ये ओहायोमधील बॉलिंग ग्रीन स्टेट युनिव्हर्सिटीमधून संगणक शास्त्रात पदव्युत्तर पदवी मिळवली. तिथेच त्यांची भेट रेनीशी झाली, जी त्यांची पत्नी बनली. नंतर शांतनू यांनी १९९३ मध्ये कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले येथील हास स्कूल ऑफ बिझनेसमधून क्लिनिकल सायकॉलॉजीमध्ये डॉक्टरेट आणि एमबीए पूर्ण केले. पूर्णवेळ काम करताना त्यांनी रात्री अभ्यास केला. अभियांत्रिकी आणि व्यवसायाच्या या संयोजनाने नंतर त्यांच्या नेतृत्व शैलीला आकार दिला. आज, ते रेनी आणि त्यांचे दोन मुलगे, श्रवण आणि अर्जुन यांच्यासह कॅलिफोर्नियातील पालो अल्टो येथे राहतात.

### अप्रेंटिसशिपने सुरुवात...

पदव्युत्तर पदवी पूर्ण केल्यानंतर शांतनू यांनी १९८६ मध्ये मेजरेक्स ऑटोमेशन सिस्टम्समध्ये त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीला सुरुवात केली. १९८९ मध्ये ते जगातील सर्वात प्रभावशाली तंत्रज्ञान कंपन्यांपैकी एक असलेल्या ॲपलमध्ये कार्यरत झाले. तिथे त्यांनी १९९५ पर्यंत प्रोडक्ट डेव्हलपमेंटची भूमिका बजावली. नंतर त्यांनी १९९६ मध्ये पिक्ट्रा इंक कंपनीची स्थापना केली. ते या कंपनीचे सहसंस्थापक होते.



### आता त्यांचा पगार कोटींमध्ये

शांतनू १९९८ मध्ये इंजिनिअरिंग टेक्नोलॉजी ग्रुपचे उपाध्यक्ष आणि जनरल मॅनेजर म्हणून ॲडोबमध्ये सहभागी झाले. तोपर्यंत त्यांना प्रोडक्ट डेव्हलपमेंट आणि एंटरप्राइझ सॉफ्टवेअरमध्ये व्यापक अनुभव मिळाला होता. ॲडोबची स्थापना १९८२ मध्ये जॉन वॉरनॉक आणि चार्ल्स जेस्के यांनी केली. शांतनू अशा वेळी या कंपनीत आले, जेव्हा कंपनीची प्रमुख उत्पादने फोटोशॉप, ॲक्रोबॅट आणि इलस्ट्रेटर हे सॉफ्टवेअर प्रसिद्ध झाले होते. शांतनू यांना २००५ मध्ये कंपनीचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. ते १ डिसेंबर २००७ रोजी वयाच्या ४४ व्या वर्षी सीईओ झाले. २०१७ मध्ये त्यांनी कंपनीच्या अध्यक्षपदाची अतिरिक्त भूमिका स्वीकारली. जीक्यू इंडियाच्या मते, २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी नारायण यांचे एकूण वेतन अंदाजे $५२ दशलक्ष (अंदाजे ४४४ कोटी रुपये) होते. सॅलरी डॉट कॉमच्या वृत्तानुसार २०२३-२३ या आर्थिक वर्षासाठी त्यांचे एकूण वेतन $४,४९,३२,५७८ होते. यामध्ये मूळ वेतन ($१,५००,०००), बोनस ($३,०००,०००), स्टॉक अवॉर्ड्स ($४०,०७७,२९५) आणि इतर भरपाई ($३५५,२८३) समाविष्ट होती.

## बिझनेस शॉर्ट न्यूज...

१ आयकर विभागाने ई-कॉमर्स कंपनी 'मीशो'ला १,५०० कोटींची कर मागणी नोटीस पाठवली आहे. कंपनीवर २०२२-२३ आर्थिक वर्षासाठी महसूल कमी दाखवल्याचा आरोप आहे. ई-कॉमर्स कंपन्यांशी संबंधित कर विवाद सामान्यतः ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सवलती आणि प्रोत्साहनांवरून उद्भवतात. बऱ्याच कंपन्या करपात्र नफा व्यवसाय खर्च म्हणून दाखवून कमी करतात, तर काही प्रकरणांमध्ये कर विभाग हे खर्च पूर्णपणे वजा करण्यायोग्य मानत नाही. मीशो कंपनीने म्हटले आहे की ती प्राप्तिकर विभागाच्या निष्कर्षांशी सहमत नाही. कंपनी तिच्या हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक कायदेशीर पावले उचलत आहे.

२ अनिल अंबानी यांच्या अडचणी वाढत आहेत. पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) च्या तक्रारीवरून केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) अनिल अंबानी, रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड आणि त्यांचे माजी संचालक मंजरी अशोक कक्कर यांच्याविरुद्ध १,०८५ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या बँक फसवणुकीचा खटला दाखल केला आहे. तक्रारीनुसार, फसवणुकीमुळे पीएनबी आणि युनायटेड बँक ऑफ इंडिया (यूबीआय) चे एकूण अंदाजे १,०८५.१९ कोटी रुपयांचे नुकसान झाले. यूबीआय आता पीएनबीमध्ये विलीन झाले आहे. आरोपींनी रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम) साठी क्रेडिट सुविधा मिळविण्याचा कट रचला. त्यानंतर त्यांनी कर्ज निधी वळवला किंवा त्याचा गैरवापर केला.

३ इराण-इस्त्रायल युद्धादरम्यान, भारत आता रशियाकडून तेल खरेदी करत आहे. अमेरिकेने भारताला ३० दिवसांची विशेष सूट दिल्यानंतर ही खरेदी सुरू झाली. या सूटनंतर, भारतीय रिफायनरीजनी समुद्रात रशियन कच्च्या तेलाचे कार्गो खरेदी पुन्हा सुरू केली आहे. २०२२ पासून रशिया भारताचा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा पुरवठादार राहिला आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या शिपिंग समस्यांमुळे जागतिक ऊर्जा बाजारपेठेत अस्थिरता निर्माण होत आहे. तथापि, सरकारी सूत्रांचे म्हणणे आहे की इराणने शेजारच्या देशांना लक्ष्य करणार नाही असे आश्वासन दिल्यानंतर या मार्गावरून जहाजांची वाहतूक लवकरच सामान्य होऊ शकते. जोखीम कमी करण्यासाठी भारतानेही कच्च्या तेलाचे स्त्रोत वाढवले आहेत. रशियाने फेब्रुवारीमध्ये भारताला अंदाजे १.०४ दशलक्ष बॅरल प्रतिदिन (bpd) तेल पुरवले, जे भारताच्या आयातीमध्ये सर्वात मोठा वाटा आहे. त्यानंतर सौदी अरेबिया (१ दशलक्ष बॅरल) आणि इराक (९.८ दशलक्ष बॅरल) यांचा क्रमांक लागतो. भारत अमेरिकेतून एलपीजी आयात वाढवण्याची योजना देखील आखत आहे.

# कर्नाटकापाठोपाठ आंध्रातही १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरण्यावर बंदी

**बंगळूरु (वृत्तसंस्था)** – कर्नाटकमध्ये १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरण्यावर बंदी घालण्याचा निर्णय मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी जाहीर केला. सोशल मीडियाचा वापर वाढला असून आता सर्वच वयोगटातील लोक याच्या आहारी गेलेले दिसतात. विशेषतः लहान मुलांवर याचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. यानंतर लहान मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवण्याची गरज अनेकांनी बोलून दाखवली होती. कर्नाटक राज्याने याबद्दल पुढाकार घेतला असून शुक्रवारी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी असेल, अशी घोषणा केली.



कर्नाटक सरकारकडून २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ४.४८ लाख कोटींचा अर्थसंकल्प सादर केला आहे. तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण उपक्रम आणि मुलांना ऑनलाईन धोक्यांपासून सुरक्षित करण्यासाठी नियामक उपायांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. या निर्णयाबाबत बोलत असताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले की, वाढत्या मोबाइल वापरामुळे मुलांवर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात येत आहे. या नियमाची अंमलबजावणी जेव्हा होईल, तेव्हा असे नियमन करणारे कर्नाटक हे पहिले राज्य असेल. सोशल मीडियाच्या अतिरिक्त वापरामुळे मानसिक आरोग्य, झोप आणि सुरक्षेवर परिणाम होत असल्याबाबत जागतिक पातळीवर चिंता व्यक्त करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

कर्नाटक उच्च न्यायालयाने दिली होती सूचना : समाजमाध्यमांचा वापर करण्यासाठी सरकारने वयोमर्यादा निश्चित करण्याचा विचार करावा, अशी सूचना कर्नाटक उच्च न्यायालयाने यापूर्वी २०२३ मध्ये दिली होती. मद्यपान करण्यासाठी वयोमर्यादा आखून देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे याचा विचार व्हावा, असे न्या. जी. नरेंदर आणि न्या. विजयकुमार पाटील यांच्या खंडपीठाने सुचवले होते. दिवसभरामध्ये मुलांचा अभ्यास व खेळाएवजी अधिकाधिक वेळ मोबाईल पाहण्यात तसेच सोशल मीडियावर रिल्स पाहण्यात तसेच चॅट करण्यातच जात असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

**देशभरात चर्चा :** हा निर्णय लागू झाल्यास इतर राज्ये आणि केंद्र सरकार याकडे लक्ष देतील, अशी शक्यता आहे. आंध्र प्रदेश आणि गोवा यांसारख्या राज्यांमध्येही या संदर्भात चर्चा सुरू आहे. ऑस्ट्रेलिया आणि काही युरोपीय देशांप्रमाणे भारतातही मुलांसाठी डिजिटल संरक्षण कायदे मजबूत होण्याची ही सुरुवात ठरू शकते.

**आंध्र प्रदेशमध्येही बंदी :** कर्नाटकप्रमाणेच आंध्र प्रदेशात १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडियावरील वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्याची योजना मांडण्यात आली आहे. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी घोषणा केली की, पुढील ९० दिवसांत १३ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातली जाईल. विधानसभेत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, ही बंदी १३ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी वाढवायची की नाही यावर ते चर्चा करत आहेत.

# राज्यात पुढील दोन दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून अनेक भागांत तापमान झपाट्याने वाढताना दिसत आहे. राज्यातील कमाल तापमानाचा पारा ३६ अंश सेल्सिअस पार करून काही ठिकाणी चाळीशीकडे झुकताना दिसत आहे. हवामान खात्याने पुढील दोन दिवस राज्यातील तापमानात आणखी वाढ होण्याचा इशारा दिला असून काही जिल्ह्यांसाठी उष्णतेचा यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मुंबई, पालघर, ठाणे आणि रायगड या किनारपट्टी भागात ८ आणि ९ मार्च रोजी उष्ण व आर्द्र हवामान राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील दोन दिवस राज्यातील कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान तज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च महिन्याच्या अखेरीस राज्यातील काही भागांमध्ये तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.



विदर्भात उष्णतेचा सर्वाधिक परिणाम दिसून येत आहे. आज राज्यातील सर्वाधिक तापमान अमरावती येथे ४०.८ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले. अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये पुढील दोन दिवस तापमान चाळीशी पार जाण्याची शक्यता असल्याने या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात तापमान सामान्यपेक्षा सुमारे पाच अंशांनी जास्त राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही तापमान ३८ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

पुणे शहरातही गेल्या काही दिवसांपासून उकाडा वाढताना दिसत आहे. गेल्या दोन दिवसांत सरासरीपेक्षा सुमारे दोन अंशांनी जास्त तापमानाची नोंद झाली आहे. पुण्यात ३५ ते ३६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले असून येत्या काही दिवसांत ते आणखी वाढण्याची शक्यता आहे. सांगली येथे ३७.४, सातारा येथे ३६.१ आणि नाशिक येथे ३६.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

दरम्यान, मराठवाड्यातही तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. परभणी येथे ३८.५ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले, तर धाराशिवमध्ये ३६.२, छत्रपती संभाजीनगर येथे ३७.६, बीड येथे ३६.६ आणि उदगीर येथे ३७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुढील दोन दिवसांत दक्षिण महाराष्ट्रातही तापमानात हळूहळू वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# कागदपत्रे घेतली, तरीही ज्योती वाघमारेंना माहिती नव्हतं; एकनाथ शिंदे यांनी उलगडलं खासदार करण्याचं गुपित



**मुंबई (प्रतिनिधी)** –महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागा रिक्त झाल्या होत्या. यासाठी भाजपकडून ४, शिवसेना शिंदे गटाकडून १, राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून आणि शरद पवार गटाकडून १ अशा सात जागा बिनविरोध झाल्या आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून शिवसेनेच्या आक्रमक नेत्या ज्योती वाघमारे यांनी राज्यसभेवर जाण्याची संधी मिळाली आहे. यामुळं शिवसेना शिंदे गटातील अनेक ज्येष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान, ज्योती वाघमारे यांच्या उमेदवारीबाबत बोलताना एकनाथ शिंद म्हणाले की, कमिटी स्थापन करण्यासाठी तुमची कागदपत्रे हवी हे सांगून आम्ही त्यांची डाक्युमेंट घेतली होती. त्यानंतर त्यांना सांगितले की राज्यसभेसाठी आपण तुमचा अर्ज भरणार आहोत. सर्वसामान्य महिलांना आपण स्थान दिल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. प्रत्येक कार्यकर्त्यावर आमचं लक्ष असतं असंही ते म्हणाले.

माझ्या वडीलांची तब्येत बरी नाही म्हणून मी येणार नव्हतो पण हा लाडका भाऊ बहिणीच्या प्रेमापासून वंचित रहायला नको म्हणून मी आलो असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. निवडणुकीत आपण वार नाही तलवार आहे, ही शमशेरीची धार आहे हे सगळ्यांना दाखवलं. मी आईची तगमग आणि बायकोची काटकसर बघीतली म्हणून लाडकी बहिण योजना सुरू केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. ज्योती वाघमारे या लाडक्या बहिणीला खासदार केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

बचत गटांच्या माध्यमातून स्त्री सक्षम केल, विविध फुड ट्रक सुरु केले. सगळ्या पदांपेक्षा लाडका भाऊ ही माझी मोठी ओळख असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. माझी आई वारली ही बातमी समजली तरी मी राजेंद्र गावित यांच्या भागात पाच ते सहा सभा घेतल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

गेल्या काही काळापासून ज्योती वाघमारे या आक्रमकपणे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची बाजू मांडत आल्या आहेत. ठाकरे गटाकडून होणाऱ्या प्रत्येक घणाघाती टीकेला ज्योती वाघमारे यांनी तितक्याच धारदार शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. मात्र, तरीही ज्योती वाघमारे या शिवसेनेतील इतर ज्येष्ठ नेत्यांच्या तुलनेत ज्योती वाघमारे नवख्या असल्याने त्यांना राज्यसभेसाठी संधी मिळेल, असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र, एकनाथ शिंदे यांनी धक्कातंत्राचा वापर करत ज्योती वाघमारे यांना उमेदवारी दिल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला.

# 'शाळा बंद' धोरणाविरुद्ध उच्च न्यायालयात आव्हान

## हायकोर्टाने बजावली शिक्षण विभागास नोटीस

**अमरावती (प्रतिनिधी)**– बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये महाराष्ट्र शासनास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील कमी पटसंख्येचे कारण पुढे करून शिक्षक पदे कमी करणे अथवा शाळा बंद करणे असे धोरण राबविता येणार नाही. या संदर्भातील जनहित याचिकेवर मुंबई उच्च न्यायालय यांच्या कोल्हापूर येथील खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायमूर्ती माधव जामदार व न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांनी महाराष्ट्र शासनासह सर्व प्रतिवादींना नोटीस बजावून २ एप्रिलपूर्वी आपले म्हणणे सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

निवृत्त उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तानाजी नलवडे तसेच महाराष्ट्र राज्याचे निवृत्त शिक्षण संचालक महावीर माने यांनी दाखल केलेल्या या जनहित याचिकेत, बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनाची असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी अधिक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना, कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये कंत्राटी धोरण राबवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होत असल्याचे याचिकेत स्पष्ट करण्यात आले आहे.

## टी. सी. हरवली

माझी धोंडीबा विठ्ठल बिडवई या नावाची इयत्ता दहावी पासची टी. सी. नांदेड ते पुणे प्रवासात हरवली आहे. ज्यांना कुणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

– संपर्क पत्ता –

**धोंडबा विठ्ठल बिडवई**

**नगरपरिषद, उमरी जि. नांदेड**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

१. सविता अंबादास कस्तुरे, २. उल्हास बाबू जाधव रा. उमरी सर्व्हे नं. २४/३ प्लॉट नं. २२, वार्ड नं. १, झोन क्र. २, न.पा.मा.क्र. ४१२, नवीन मालमत्ता क्र. १६२८. या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, गंगाधर नागनाथ कस्तुरे रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी सर्व्हे नं. २४/३ प्लॉट नं. २२, वार्ड नं. १, झोन क्र. २, न.पा.मा.क्र. ४१२, नवीन मालमत्ता क्र. १६२८. ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे. पूर्वेस –लक्ष्मण राजन्ना कस्तुरे यांची जमीन, पश्चिमेस –६ मीटर रस्ता, दक्षिणेस –प्लॉट क्र. २३, उत्तरेस –प्लॉट क्र. २१.

खरेदीखत/बयनामा/रजिस्ट्री क्रमांक १०८०/२०२५ दि. २३/०७/२०२५ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये १. सविता अंबादास कस्तुरे, २. उल्हास बाबू जाधव यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरीलप्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

**नगरपरिषद, उमरी जि. नांदेड**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

मारोती विलासराव कदम रा. वाघाळा उमरी सर्व्हे नं. ४ पैकी प्लॉट नं. ८३ वार्ड नं. १, झोन क्र. २, न.पा.मा.क्र. २१३, नवीन मालमत्ता क्र. १६७६ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, लक्ष्मीबाई दिगंबर पाटील रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी सर्व्हे नं. ४ पैकी प्लॉट नं. ८३ वार्ड नं. १, झोन क्र. २, न.पा.मा.क्र. २१३, नवीन मालमत्ता क्र. १६७६ ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे. पूर्वेस –प्लॉट क्र. ११६, पश्चिमेस –न. पा. रस्ता, दक्षिणेस –न. पा. रस्ता, उत्तरेस –प्लॉट क्र. ८४.

खरेदीखत/बयनामा/रजिस्ट्री क्रमांक १७६४/२०२५ दि. २९/१२/२०२५ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये मारोती विलासराव कदम यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरीलप्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

**नगरपरिषद, उमरी जि. नांदेड**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

सीमाताई सुधाकर देशमुख रा. धानोरा बु. उमरी सर्व्हे नं. ४ पैकी प्लॉट नं. ५९ वार्ड नं. १, झोन क्र. २, न.पा.मा.क्र. २१७, नवीन मालमत्ता क्र. १६८० या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, महमद रफीक महमद सजन रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी उमरी सर्व्हे नं. ४ पैकी प्लॉट नं. ५९ वार्ड नं. १, झोन क्र. २, न.पा.मा.क्र. २१७, नवीन मालमत्ता क्र. १६८० ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे. पूर्वेस –खुली जागा, पश्चिमेस –रस्ता, दक्षिणेस –प्लॉट क्र. ६०, उत्तरेस –प्लॉट क्र. ५८.

खरेदीखत/बयनामा/ रजिस्ट्री क्रमांक २३६/२१५ दि. २६/२/२०१५ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये सीमाताई सुधाकर देशमुख यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरील प्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

## Change In Name

My Old Name is **AHMAD KHAN KHATTAL AHAMED KHAN** which now I am changing as New Name **AHMED KHAN KHATTAL AHMED KHAN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. **Address - AHMED KHAN KHATTAL AHMED KHAN** H.No. 2-8-46, NTC Mill Gate, Nanded (MS) 431601 Mo.No.7887414802

## Change In Name

My Old Name is **Ujjawala Pandhari Jumbad** which now I am changing as New Name **Ujjawala Govindrao Warwantkar.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - At.Po. Bori (Bk.) Tq. Kandhar Dist. Nanded 431714**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड**

## जाहीर प्रगटन

श्री सुमेध अशोक जाधव गट क्र. ४११ मधील प्लॉट क्र. -- ज्याचा जुना वार्ड नं. ५, जुना मालमत्ता क्र. ११९०, नवीन वार्ड नं. १०, नवीन मालमत्ता क्र. ७८३/१ वर बांधकाम परवानगी मिळण्याकरिता नगर परिषद नोंदणीकृत अर्किटेक्ट/इंजिनिअर यांचेकडे ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. जागेची लांबी-उत्तर-दक्षिण १३.७२ मीटर, जागेची रुंदी- पूर्व-पश्चिम १२.८० मीटर, चतुःसीमा- पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस-सदर जागेपैकी विक्री करणाऱ्याची उर्वरित जागा, दक्षिणेस-शेजाऱ्याची मोकळी जागा व राहुल कदम यांचे घर, उत्तरेस-रस्ता. वरील चतुःसीमेतील जागेवर बांधकाम परवानगी देणेबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितांनी आवश्यक लेखी/पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद भोकर यांचेकडे दाखल करावी. मुदतीनंतर प्राप्त हरकतीबाबत कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड**

## जाहीर प्रगटन

सौ. सुजाता आनंदराव सूर्यवंशी गट क्र. ६०५ मधील प्लॉट क्र. २ ज्याचा जुना वार्ड नं. ३, जुना मालमत्ता क्र. १०७२, नवीन वार्ड नं. २, नवीन मालमत्ता क्र. १३८ वर बांधकाम परवानगी मिळण्याकरिता नगर परिषद नोंदणीकृत अर्किटेक्ट/इंजिनिअर यांचेकडे ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. जागेची रुंदी-उत्तर-दक्षिण ९.१४ मीटर, जागेची रुंदी- पूर्व-पश्चिम १५.२४ मीटर, चतुःसीमा पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस-सदर जागेपैकी विक्री करणाऱ्याची उर्वरित जागा, दक्षिणेस-रस्ता, उत्तरेस- रामचंद्र आसावा.

वरील चतुःसीमेतील जागेवर बांधकाम परवानगी देणेबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितांनी आवश्यक लेखी/पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद भोकर यांचेकडे दाखल करावी. मुदतीनंतर प्राप्त हरकतीबाबत कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड**

## श्री संगमेश्वर देवस्थान संगम, ता.बिलोली जि.नांदेड

A-2284 (नांदेड)

**वरील देवस्थानची जमीन जाहीर लिलावाद्वारे लावण करण्यात येणार आहे. खालील तारखेस श्री संगमेश्वर देवस्थान संगम ता.धर्माबाद जि.नांदेड येथे जमिनीची लावण करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | गाव | जमीन | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मौ.बामणी (थडी) ता.धर्माबाद जि.नांदेड | गट नं. 78 मध्ये 2 हेक्टर | 13/03/2026 | सकाळी 9-00 वा. | श्री संगमेश्वर देवस्थान, संगम ता.धर्माबाद जि.नांदेड |
| 2 | मौ.दौलापूर ता.बिलोली जि.नांदेड | गट नं. 1 मध्ये 1 हेक्टर 62 आर | 13/03/2026 | दुपारी 10-00 वा. | श्री संगमेश्वर देवस्थान, संगम ता.धर्माबाद जि.नांदेड |
| 3 | मौ.मोकळी ता.धर्माबाद जि.नांदेड | गट नं. 126 मध्ये 3 हेक्टर 05 आर | 13/03/2026 | सकाळी 11-00 वा. | श्री संगमेश्वर देवस्थान, संगम ता.धर्माबाद जि.नांदेड |
| 4 | मौ.मोकळी ता.धर्माबाद जि.नांदेड | गट नं. 6 मध्ये 1 हेक्टर 67 आर | 13/03/2026 | | श्री संगमेश्वर देवस्थान, संगम ता.धर्माबाद जि.नांदेड |
| 5 | मौ.मोकळी ता.धर्माबाद जि.नांदेड | गट नं. 83 मध्ये 1 हेक्टर 59 आर | 13/03/2026 | | श्री संगमेश्वर देवस्थान, संगम ता.धर्माबाद जि.नांदेड |
| 6 | मौ.विळेगाव ता.धर्माबाद जि.नांदेड | गट नं. 102 मध्ये 3 हेक्टर | 14/03/2026 | दुपारी 2-00 वा. | श्री संगमेश्वर देवस्थान, संगम ता.धर्माबाद जि.नांदेड |
| 7 | मौ.येवती ता.धर्माबाद जि.नांदेड | गट नं. 115 मध्ये 2 हेक्टर 26 आर | 14/03/2026 | दुपारी 3-00 वा. | श्री संगमेश्वर देवस्थान, संगम ता.धर्माबाद जि.नांदेड |
| 8 | मौ.मनुर व संगम ता.धर्माबाद जि.नांदेड | गट नं. 25 मध्ये 1 हेक्टर 52 आर | 14/03/2026 | दुपारी 4-00 वा. | श्री संगमेश्वर देवस्थान, संगम ता.धर्माबाद जि.नांदेड |

वरील जमिनीचा लिलाव निरीक्षक साहेब धर्मदाय उपायुक्त कार्यालय, नांदेड यांचे समक्ष होऊन सर्वात जास्त बोली बोलणा-यास जमीन वहितासाठी पाडवा 2026 ते पाडवा 2027 या एक वर्षासाठी देण्यात येणार आहे. बोलीतील 50 % रक्कम न्यासाकडे त्याचदिवशी जमा करणे बंधनकारक राहील. लिलावानंतर उर्वरीत रक्कम आठ दिवसात न्यासाकडे जमा करुन ताबा घेण्यात यावा आणी उर्वरीत रक्कम आठ दिवसात न्यासाकडे जमा न केल्यास बोलीतील 50 % रक्कम परत मिळणार नाही. महाराष्ट्रातील कोणत्याही व्यक्तीस बोलीमध्ये सहभागी होता येईल. काहीं अपरिहार्य कारणास्तव बोली दिलेल्या तारखेस न झाल्यास तो रद्द करण्याचा अधिकार न्यासाकडे राहील. सदर लिलावाच्या शर्ती व अटी न्यासाकडे पहावयास मिळतील. तसेच सदरील लिलावामध्ये जमीनीस योग्य मोबदला मिळत नसल्यास तो रद्द करण्याचा अधिकार न्यासास राहिल.

**अध्यक्ष**
**श्री संगमेश्वर मंदिर देवस्थान, संगम**
**ता. बिलोली, जि. नांदेड**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड**

## ई निविदा सूचना क्रमांक (२३) सन २०२५–२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड जि.नांदेड (दुरध्वनी क्रमांक ०२४६२–२५३७११) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण ०१ कामांकरीता इपीसी (एझउ) नमुन्यातील ई–निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

टीप – १) निविदा कागदपत्राचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई–टेंडरींग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ Am{U www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. २) सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनि बांधकाम विभाग, नांदेड जि. नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड**


**4000 x 4 =16000 इस्क्वायर फूट**


**4 मजली हॉस्पिटल, लॉजिंग, बोर्डिंग, ऑफिस, यासाठी किरायाने देणे आहे**

9763226190
7972231307

पत्ता : कामठा बायपास गट नं. 2015 प्लॉटनं. 2 गुरुकृपा कॉप्लेक्स, शंकरराव चव्हाण चौक, नांदेड-431605

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धा संपन्न

## ■ महिलांनी कुटुंब सांभाळत समाजाच्या हितासाठी पुढे यावे -प्रा. डॉ. विजया उफाडे

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – आजच्या काळात महिलांनी सामाजिक, कौटुंबिक आणि व्यावसायिक क्षेत्रात आपले अस्तित्त्व निर्माण केले आहे. त्या स्वावलंबनासोबत स्वसुरक्षेतही सक्षम ठरत आहेत आणि कोणत्याही आव्हानांचा सामना करण्यास सिद्ध आहेत. महिलांनी केवळ कुटुंबाच्या विकासापुरते मर्यादित राहू नये, तर समाजासाठीही पुढे येऊन कार्य करावे, असे आवाहन प्रा. डॉ. विजया उफाडे -दाढेल यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित मराठवाडा विभागस्तरीय महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेत त्या अध्यक्षीय भाषणात बोलत होत्या. सिडको येथील इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या मैदानावर ७ मार्च रोजी झालेल्या या कार्यक्रमात कोरो इंडिया, एकल महिला संघटना आणि विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात आला. उद्‌घाटन मन्नत तेलंगे यांच्या हस्ते करण्यात आले, तर प्रमुख पाहुणे म्हणून कोरो इंडियाचे कार्यकर्ते लक्ष्मीताई



वाघमारे, रुक्मिणीताई नागापुरे, लक्ष्मण हजारे, रवींद्र नन्नावरे मुंबई, प्रा. वैशाली सावंत उपस्थित होत्या. कबड्डी स्पर्धेतील विजेत्या संघांना महापौर कविता मुळे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका सुवर्णाताई बस्वदे, निरंजनाताई लांडगे, माजी नगरसेविका बेबीताई गुपिले, संतोष मुळे, तालुका क्रीडा अधिकारी बालाजी शिरशीकर, कोच म्हणून प्रा. डॉ. रमेश नांदेडकर व त्यांची टीम आदी जणांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. इरवंत सूर्यकार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा खानजोडे यांनी केले.

यामध्ये संकल्प महिला कबड्डी संघ लातूर यांनी प्रथम पारितोषिक पाच हजार रुपये व मेडल ट्रॉफी त्यानंतर द्वितीय पारितोषिक विठाई महिला कबड्डी संघ अहमदपूर यांना ३००० रुपये, प्रमाणपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले व तृतीय पारितोषिक कुशीधारा महिला कबड्डी संघ सिडको यांना दोन हजार रुपये पारितोषिक, प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात आली.

उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार अनिता तेलंग, शीला जाधव, बायजाबाई यांना देण्यात आला. याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये दीपाली मोरे यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. कोकणच्या पुण्यभूमीवर दोनच राजे इथे जन्मले यावर सुद्धा उत्कृष्ट सादरीकरण मुलींनी केले. त्यांनाही प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजक मराठवाडा विभागातील संस्था – वंचित विकास लोकसंस्था नांदेडचे समता फेलो ज्ञानोबा सूर्यवंशी, संचालक रेखाताई सूर्यवंशी, रयत सेवाभावी संस्थेचे संचालक इरवंत सूर्यकार, सपना टोमके, भारतीय भटक्या विमुक्त जाती विकास संस्थेचे देविदास हादवे, गणेश शिंदे, जनजागृती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संचालक अंकुश वाघमारे, जिजामाता सेवाभावी संस्थेचे संचालक अण्णाराव सूर्यवंशी, जनविकास मंडळ बाऱ्हाळीचे संचालक एच. पी. कमलाकर, समता फेलो आनंदा बनकर, मास्टर माधव पवार, रूढीग्रस्त लोक वंचित कलावंत परिषद परभणीचे बायजाबाई, सन्मान सर्वांगी मानव विकासचे संचालक शिवाजी कांबळे, संकल्प सेवाभावी संस्थेचे संचालक दीपक कांबळे यांच्यासह परभणी, लातूर, नांदेड व हिंगोली जिल्ह्यातील महिला कबड्डी खेळाडू उपस्थित होत्या.

# आ. चिखलीकर यांच्या हस्ते यूपीएससी परीक्षेतील रँक मिळविलेला ऋषिकेश पालीमकरचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)** –कंधार तालुक्यातील कौठा येथील ग्रामविकास शिक्षण संस्था संचालित गोविंदराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिखली येथील प्रा. रामकिशन गंगाधरराव पालीमकर यांचे सुपुत्र ऋषिकेश रामकिशन पालीमकर यांनी यूपीएससी परीक्षेत २८६ वा रँक मिळवून उज्ज्वल यश संपादन केले आहे.

पालीमकर यांच्या यशाबद्दल रविवारी साई-सुभाष वसंतनगर नांदेड येथे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर व वसंतनगर येथील नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप प्रदेश महिला मोर्चा उपाध्यक्षा सौ. प्रणिताताई देवरे-चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, कार्याध्यक्ष माधव पावडे, आर. डी. कवळे, अ‍ॅड, संदीप पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, कैलास देशमुख गोरठेकर, बाबुराव देशमुख कौठेकर, अशोक माधवराव देशमुख, डॉ. सुनिल देशमुख, संजय देशमुख सभापती कृऊबास कंधार, पी. डी. जाधव, देवराव कंकाळ, प्रवीण साधू, बी. आर. कदम, माणिकराव चव्हाण, प्रवीण कदम, विशाल कदम, शिवाजीराव हुसेकर, प्रकाश राशतवार, शंकरराव वट्टमवार, संदीप चिटमलवार, बालाजी उत्तरवार, संजय वांगीकर, दिलीप टाकळीकर, योगेश वट्टमवार, प्रवीण दमाम, डॉ. गणेश मनुकर, डॉ. स्वप्नील आढाव, डॉ. संकेत आढाव, राहूल पाटील, मनोहर पवार यांची उपस्थिती होती.

# जागतिक महिला दिनानिमित्त ‘नवरत्नांचा’ गौरव आणि मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**किनवट (प्रतिनिधी)** –भारत जोडो युवा अकादमी संचालित साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलच्यावतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे यांच्या नेतृत्त्वाखाली विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ९ कर्तबगार महिलांचा (नवरत्नांचा) गौरव करण्यात आला आहे.

महिलांच्या आरोग्याप्रती जागरुकता निर्माण करण्यासाठी एम.आय.डी.सी. नांदेड रोडवरील साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल येथे हे मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात उपस्थित सर्व महिलांची डॉ. दुर्गा काकडे, डॉ. विद्या गोलकोंडावार, डॉ. ऋतुजा चाडावार, डॉ. वैष्णवी पद्मावार, यांनी विनामूल्य आरोग्य तपासणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर यांनी केले. केवळ आरोग्यच नव्हे,



किनवट या आदिवासी भागातील समाजाच्या विविध स्तरांत आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटवणाऱ्या महिलांना या प्रसंगी सन्मानित करण्यात आले. यामध्ये कांताबाई कांबळे-अंगणवाडी सेविका, ललिता वाघमारे-अंगणवाडी मदतनीस, अर्चना गुडसेवार - आशा वर्कर, सुनंदा नामदेव येसंबरे - आरोग्य सेविका, लक्ष्मीबाई कोटनाक -बचतगट प्रतिनिधी, बी. एम. आरोग्य पर्यवेक्षिका, पुण्यरथा उमरे - तामगाडगे - शिक्षिका, सुनिता आत्राम - महिला सरपंच व शिवलिला घुले अशा एकूण ९ कर्तबगार महिलांचा विशेष सत्कार करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन तालुका आरोग्य अधिकारी श्री. के.पी. गायकवाड यांनी केले तर मंचावर संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, डॉ. सुनंदा घडसिंग, डॉ. वंदना पत्की, डॉ. भाग्यश्री बेलखोडे, हे उपस्थित होते. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी संस्थेच्या कार्याची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. दुर्गा काकडे यांनी केले तर नेहा गिते यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीयतेसाठी भारत जोडो युवा अकादमी व साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पीपल्समध्ये आज परिसंवाद व पुस्तक लोकार्पण सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)** –आंतरराष्ट्रीय महिलादिनानिमित्त येथील पीपल्स कॉलेजमध्ये एकदिवसीय परिसंवाद व पुस्तक लोकार्पण समारंभाचे आयोजन ९ मार्च रोजी नरहर कुरुंदकर सभागृहात केले आहे.

समकालीन लेखिकांचे साहित्यिक सरोकार या विषयावर आधारित परिसंवादात विविध मान्यवर वक्ते मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाचा उद्‌घाटन समारंभ सकाळी १० वाजता होणार असून, अध्यक्षस्थानी डॉ. प्रवीण पाटील तर उद्‌घाटक म्हणून प्रा. श्यामल पत्की यांची उपस्थिती राहणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य डॉ. सतीश यादव यांची उपस्थिती राहणार आहे. प्राचार्य डॉ. एस. जी. भानेगावकर, उपप्राचार्य डॉ. ए. एन. सिद्धेवाड यांची प्रमुख उपस्थिती राहील. सकाळी ११.३० च्या पहिल्या सत्रात जया जादवानी का रचना संसार' आणि ‘कैवारी’ या काव्यसंग्रहात चित्रित स्त्री विषयावर डॉ. गोविंद बुरसे, डॉ. बळीराम धापसे हे मांडणी करणार आहेत.

दुपारी २ ते ४ या सत्रात सुशीला टाकभोरे व देवकीनंदन शुक्ल यांचे साहित्यिक योगदान या विषयावर डॉ. जयराम सूर्यवंशी व डॉ. गोविंद शिवशेट्टे हे बोलतील. अध्यक्षस्थानी डॉ. संदीप पाईकराव हे राहणार आहेत. सायंकाळी ४ वाजता कार्यक्रमाचा समारोप होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जी. भानेगावकर हे राहणार असून, उपप्राचार्य डॉ. सिद्धेवाड, प्राचार्य डॉ. सतीश यादव व प्रो. डॉ. वर्षा सहदेव यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. भगवान जाधव, डॉ. मुकुंद कवडे आहेत. साहित्यप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘यशवंत’ मध्ये शोधचक्र प्रणालीवर ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– संशोधन क्षेत्रातील आधुनिकता आणि सुसूत्रता लक्षात घेऊन यशवंत महाविद्यालयाने संशोधक, मार्गदर्शक आणि प्राध्यापकांसाठी ‘शोधचक्र’ संशोधन कार्यप्रणाली व्यवस्थापन प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन प्रशिक्षण आणि जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांचे मार्गदर्शन व अध्यक्षतेखाली इन्फ्लिबनेट सेंटर, गांधीनगर, गुजरात व यशवंत महाविद्यालय ग्रंथालय यांच्यावतीने हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

संशोधकांसाठी डिजिटल व्यासपीठ ‘शोधचक्र’ हे प्लॅटफॉर्म संशोधनाच्या सुरुवातीपासून ते प्रबंध सादर करण्यापर्यंतच्या सर्व टप्प्यांवर संशोधक विद्यार्थी आणि त्यांच्या पर्यवेक्षकांना तांत्रिक सहाय्य करण्यासाठी विकसित करण्यात आले आहे. या सत्राचा मुख्य उद्देश संशोधन कार्याचे अचूक व्यवस्थापन करणे, कामाच्या प्रगतीचा मागोवा घेणे आणि शैक्षणिक नियमांचे व गरजांचे पालन करणे, याविषयी सविस्तर माहिती देणे हा आहे.

# नांदेड ग्रामीण पोलीस उपविभागासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध

**अर्धापूर (प्रतिनिधी)**–येथील नांदेड ग्रामीण पोलीस उपविभागासाठी शासनातर्फे मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७६(३) अन्वये सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असणाऱ्या गुन्ह्यात फॉरेन्सिक पथकाची भेट अनिवार्य करण्यात आली आहे.

या अनुषंगाने येथील नांदेड ग्रामीण उपविभागासाठी एम.एच.१२ झेड. सी. ९८६९ ही मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन विविध रसायने, साधनसामुग्री व कर्मचाऱ्यांच्या दोन गटांसह उपलब्ध झाली असून या



मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे मुख्यालय अर्धापूर येथे अहोरात्र राहील.

या पोलीस उपविभागांतर्गत येणाऱ्या अर्धापूर, बारड, मुदखेड व लिंबगाव पोलीस स्टेशनच्या तपासिक अंमलदारांनी गुन्ह्यांच्या घटनास्थळावरील अधिक पुरावे जमा करण्यासाठी या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनच्या पथकाचा उपयोग घेऊन अधिकाधिक गुन्हे उघडकीस आणण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी संजीवन मिरकले यांनी केले आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक दत्तात्र वानी, सपोउपनी चाऊस, सय्यद सलीम यांच्यासह मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# किशनराव जाधव यांचे निधन



**हदगाव (प्रतिनिधी)** – किशनराव प्रभूजी पाटील जाधव (वय ७९ वाटेगाव) यांचे रविवार, दि. ८ मार्च रोजी सकाळी ४:३० वाजता निधन झाले त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी ३ वाजता वाटेगाव येथे त्यांच्या शेतात करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात ३ मुले, मुली, जावई, ३ सुना, पुतणे, भाऊ, बहिणी नातवंड असा परिवार आहे. ते उत्तमराव, शिवाजीराव व मारोतराव यांचे वडील होत.

# बॅग लिफ्टींग करणारा एलसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांच्या नजरा चुकवून बॅग लिफ्टींग करणारा चोरटा स्थानिक गुन्हा शाखेच्या जाळ्यात अडकला आहे. त्याच्याकडून २० हजारांची रोख रक्कम जप्त केली आहे. उर्वरित आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या सहकाऱ्यांना आदेश दिले त्याप्रमाणे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांच्या पथकातील अंमलदारांना आरोपींची गुप्त माहिती मिळाली होती. यानुसार



उमरी पोलीस ठाणे हद्दीत ४ ते ५ महिन्यापूर्वी एका व्यापाऱ्याची पैशाची बॅग हिसकावून नेणारा आरोपी रवी देविदास दुधमल (वय १९ रा. गौतमनगर, सांगवी) यास दि. ८ मार्च रोजी सापळा रचून ताब्यात घेतले. त्याने त्याच्या इतर २ साथीदारांसह मिळून दुकान बंद करून घराकडे जाणाऱ्या व्यापाऱ्याची पैशाची बॅग चोरी केल्याची कबुली दिली. सदर आरोपीचे ताब्यातून गुन्ह्यात चोरलेले रोख रक्कम २० हजार रुपये जप्त करण्यात आले. या आरोपीस मुद्देमालासह पुढील कायदेशीर कारवाईसाठी उमरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# महिलांच्या गर्भाशय मुखाचा कर्करोग लसीकरण शिबिराचे उद्‌घाटन

**लोहा (प्रतिनिधी)**– महिलांमध्ये गर्भशय मुखाच्या कॅन्सरचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी वेळीच वैद्यकीय लसीकरण आवश्यक असते. जागतिक महिला दिनाच्या दिवशी लोह्यातील मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये भाजपाच्या प्रदेश महिला आघाडीच्या उपाध्यक्षा प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांच्या हस्ते लसीकरण शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. याचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा व आरोग्य सुदृढ ठेवावे, असे आवाहन प्राणिताताई यांनी केले.

हृदय रोगतज्ज्ञ डॉ. मिलिंद धनसडे यांच्या मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये प्रसिद्ध स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. शमा कोरपेनवार -बुक्तरे यांच्या पुढाकाराने जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर गर्भाशयाच्या मुखाचा कॅंसर लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले होते. भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. वयोगट ९ ते १४ आणि १५ ते ४० वयोगटातील स्त्रियांना हे लसीकरण उपयुक्त आहे. लसीकरण केल्याने गर्भपिशवीच्या मुखाचा कॅंसर होत नाही.

या लसीकरणाची अत्यंत गरज असून गर्भशय पिशवी काढून टाकण्याचे वाढते प्रमाण स्त्रियांच्या आरोग्यासाठी घातक आहे. तसेच कर्क रोगामुळे जीव गमवावा लागतो आहे. तेव्हा हे लसीकरण महिलांच्या आरोग्यासाठी उपयुक्त आहे. डॉ. धनसडे यांनी ग्रामीण भागातील अद्ययावत उभी



केलेली आरोग्यसेवा रुग्ण व नातेवाईकांना दिलासा देणारी आहे. डॉ. शमा यांनी लसीकरण शिबीर ठेवून महिलांना जनजागृती व त्यांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी उपक्रम हाती घेतला आहे. तेव्हा परिसरतील जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांनी केले.

यावेळी माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, डॉ. मिलिंद धनसडे, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. शमा कोरपेनवार-बुक्तरे, प्रा. डॉ. शारदा धनसडे, माजी नगरसेविका शोभाताई बगडे, सौ. डोंगरे, निदान क्लिनिकल लॅबोरेटरीच्या संचालिका अरुणा कदम, मेडिकेअरचे आनंद धनसडे, अनिता धनसडे, डॉ. धनसडे यांचे वडील उत्तमराव आणि भारतबाई धनसडे, डॉ. आचणे, डॉ. बुक्तरे, नगरसेवक अविनाश पवार, नगरसेवक सतीश निखाते, नगरसेवक तुकाराम दाढेल, नगरसेवक सदा तेलंग, नगरसेवक मंजलवाड, अन्वर पठाण, व्यंकट जंगले, सुधीर धनसडे, तनय धुतमल यासह हॉस्पिटलचा स्टाप उपस्थित होता.

# महिला दिनानिमित्त अस्मिता महिला लीग स्पर्धेकरिता जिल्ह्यातील मुली व महिला खेळाडूंचा प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारत सरकार, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय यांचेकडून प्राप्त पत्रानुसार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अस्मिता महिला लीग आयोजनासंबंधी मानक कार्यपद्धती निर्गमित करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने भारतीय क्रीडा प्राधिकरण, फिट इंडिया, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड, खेलो इंडिया, माय भारत, युवा कार्य, क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने व सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या सहकार्याने दि. ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अस्मिता महिला लीग स्पर्धेचे आयोजन सायन्स कॉलेज मैदान, नांदेड येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप ह्या होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर, माय भारत भारत सरकार, प्रलोभ कुलकर्णी, नांदेड जिल्हा हौशी अ‍ॅथलेटिक संघटना शिवकांता देशमुख, राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ. अश्विन बोरीकर, संजय बेतीवार, क्रीडा अधिकारी, राहूल श्रीरामवार, क्रीडा अधिकारी नागनाथ डांगे, सेवानिवृत्त तहसीलदार धाराशिव आदी मान्यवर उपस्थित होते. तर विजेत्या खेळाडूंना डॉ. एल. पी. शिंदे, प्राचार्य सायन्स कॉलेज नांदेड यांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला.

उद्‌घाटनीय कार्यक्रम मनोगत प्रसंगी डॉ. अश्विनी जगताप यांनी उपस्थित खेळाडूंना महिला ह्या प्रत्येक क्षेत्रामध्ये अग्रेसर असून शासनामार्फत प्रत्येक क्षेत्रामध्ये मुक्त व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याप्रमाणे आपल्या सवयीमध्ये बदल करुन प्रत्येक क्षेत्रामध्ये अग्रेसर राहण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय महिला दिना निमित्त अस्मिता महिला लीग यामध्ये जिल्ह्यातील १५० ते २०० मुली व महिला खेळाडूंनी सहभाग घेतला असून, त्याचा अंतिम निकाल खालीलप्रमाणे आहे.

१३ वर्षाआतील -१०० मी.धावणे- प्रथम, सई बालाजी पतंगे- शाकुंतल इं.मे.स्कूल, नांदेड, द्वितीय- संगीता बबन मटके- जि.प.प्रा.शा.पार्डी ता.लोहा, तृतीय- संधीती गजानन डिकळे- जि.प.प्रा.शा. पार्डी २०० मी. धावणे- प्रथम- शुभश्री बळीराम पवार- जि.प.प्रा.शा. पार्डी, द्वितीय- सई बालाजी पतंगे- शाकुंतल इं.मे. स्कुल, नांदेड, तृतीय- कोमलकोट रामसिंग बावरे- अशोक प्र.विद्यालय, विष्णुनगर, नांदेड ४०० मी. धावणे- प्रथम- वेदिका विश्वनाथ मोखले-जि. प. प्रा. शाळा, पार्डी, द्वितीय- कोमलकौर बावरी-अशोक प्रा. विद्यालय, विष्णुनगर नांदेड, तृतीय-जागृती मिलिंद गजभारे- सचखंड पब्लिक स्कूल, नांदेड. तसेच १३ ते १८ वर्षातील -१०० मी.धावणे- प्रथम, श्रेया संजय सुदेवाड-शासकीय आश्रमशाळा, दुधड ता. हि. नगर, द्वितीय-मुक्ताई परमेश्वर इजेपवार, शासकीय आश्रमशाळा, दुधड तृतीय- ओमीका किरण पाटील- पीपल्स हायस्कूल, नांदेड २०० मी.धावणे-प्रथम- श्रेया संजय सुदेवाड- शासकीय आश्रमशाळा, दुधड ता. हि.नगर, द्वितीय- श्रृध्दा बालाजी कुलुपवार, के.आर.एम. ज्यु.कॉलज, नांदेड, तृतीय- आरती पवार- श्री संत गाडगे महा वि. लोहा ४०० मी.धावणे- प्रथम- श्रृध्दा बालाजी कुलुपवार, के.आर.एम. ज्यु.कॉलेज,नांदेड, द्वितीय- श्रृध्दा परमेश्वर मुंडकर- पीएम श्री केंद्रीय विद्यालय, नांदेड, तृतीय- वनिता संतोष कल्याणकर- जिल्हा परिषद हायस्कूल, बारड ता.मुदखेड १८ वर्षापुढील मुली व महिला -१०० मी.धावणे- प्रथम, तेजस्विनी संघरत्न कांबळे- सायन्स कॉलेज, नांदेड द्वितीय- पालनवार प्रियंका संतोष, शांतीनिकेतन हाय, कुंटूर, तृतीय- प्रिती बालाजी- डी.बी.कॉलेज, भोकर ता.भोकर २०० मी.धावने- प्रथम- स्वाती रामभाडफ ठोंम्बरे- डी.एस.एम.कॉलेज, परभणी, द्वितीय- तेजस्विनी संघरत्न कांबळे- सायंन्स कॉलेज, नांदेड, तृतीय- विदया बालाजी खरबे, बळीराम पाटील विद्यालय, पेनूर ता.लोहा आदींचा सहभाग होता.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com